रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १६ ◆ अंक १४२
www.ramprahar.com
# राम प्रहर
शनिवार, ९ डिसेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## तृणमूल काँग्रेसच्या महुआ मोईत्रांची खासदारकी रद्द



**नवी दिल्ली** : पैसे घेऊन लोकसभेत प्रश्न विचारण्याच्या प्रकरणात तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा यांचे सदस्यत्व रद्द करण्यात आले आहे. सभागृहाचे कामकाज सुरू होताच लोकसभेत संसदेच्या एथिक्स कमिटीचा अहवाल सादर करण्यात आला. यानंतर मोईत्रा यांचे सदस्यत्व रद्द करण्यासाठी एनडीएने आणलेला ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. पैसे घेऊन संसदेत प्रश्न विचारल्याचा आरोप खासदार निशिकांत दुबे यांनी केल्यानंतर मोइत्रा यांनी हे आरोप फेटाळले, मात्र उद्योगपती दर्शन हिरानंदानी यांना आपण संसदेचे लॉगइन आणि पासवर्ड दिल्याची कबुली दिली होती. दरम्यान, दुबे यांनी केलेल्या आरोपांमध्ये नीतिमत्ता समितीच्या तपासात तथ्य आढळल्याने मोइत्रा यांचे सदस्यत्व रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी स्पष्ट केले.

## अंतरंग

पनवेल महापालिकेच्या भरती परीक्षेला प्रारंभ/३
माणगावची काळ नदी प्रदूषित; नागरिक, जलचरांना फटका/५
शिक्षकांनाही आश्वासित प्रगती योजनेचा मिळणार लाभ/७

(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

### आमदार प्रशांत ठाकूर यांनी ठेवीदारांचा आवाज केला बुलंद

# उरण चिटफंड प्रकरण विधिमंडळात

### ठेवीदारांचे पैसे परत मिळणार –गृह व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस




**नागपूर, पनवेल : रामप्रहर वृत्त**


गुंतवणुकीवर जास्त परतावा देण्याचे प्रलोभन दाखवून सर्वसामान्यांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याप्रकरणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी हिवाळी अधिवेशनात ठेवीदारांचा आवाज बुलंद केला. त्यावर ठेवीदारांचे पैसे परत मिळण्याचे आश्वासन राज्याचे गृह व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळात दिले. त्यामुळे ठेवीदारांना दिलासा मिळाला आहे.

उरण येथील चिटफंड घोटाळ्यातील मुख्य आरोपी सतीश गावंडने ३० ते ५० दिवसांत जास्त परतावा देण्याचे आमिष दाखवून सर्वसामान्य लोकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले. त्यानंतर त्याला पोलिसांकडून अटक आणि न्यायालयाकडून जामीनही झाले. तरी त्याच्याकडून ठेवीदारांना त्यांच्या गुंतवणुकीचा परतावा मिळाला नाही. जामिनावर असताना सतीश गावंडने पलायन केले, तो फरार झाला. त्यानंतर मध्य प्रदेशमधून त्याला जेरबंद करण्यात आले. त्याच्याविरोधात लोकांचा आक्रोश निर्माण झाला.

दरम्यान, ठेवीदारांना न्याय व त्यांच्या कष्टाचे पैसे परत मिळाले पाहिजे यासाठी आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी तारांकित प्रश्न दाखल केला होता. त्या अनुषंगाने या विषयाचे गांभीर्य लक्षात घेता आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधिमंडळात प्रश्न उपस्थित करीत सर्व ठेवीदारांच्या पैशाचा परतावा करण्याची आग्रही मागणी केली.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हटले की, उरण तालुक्यातील सतीश गावंड याने ५० दिवसांत रक्कम दुप्पट करून देतो सांगून जवळपास २०० कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचा घोटाळा केला आहे. अनेक सर्वसामान्य ठेवीदारांनी दुप्पट पैसे मिळण्याच्या लोभाने मेहनतीची कमाई त्याच्या सुपूर्द केली. जवळपास आठ ते दहा महिने हा आरोपी गायब होता. अटक झाल्यानंतर सत्र न्यायालयाने त्याला आश्चर्यकारकरित्या जामीन मंजूर केला. हा जामीन कसा झाला याची चर्चा न्यायालयात व वकिलांमध्ये होती. पुन्हा नव्याने गुन्हे दाखल झाले नसते तर हा आरोपी जेरबंद झाला नसता. सतीश गावंड हा निर्ढावलेला होता. त्याने मधल्या कालावधीत लोकांना पुन्हा आमिष दाखवून जवळपास ५० ते ६० कोटी रुपये घेतले. नवी मुंबई पोलिसांनी या प्रकरणात योग्य ती कारवाई केली आणि अखेर त्याला जेरबंद केले, पण या घोटाळ्यातून हजारो ठेवीदारांचे पैसे गेले आहेत. त्या सर्व ठेवीदारांना त्यांचे पैसे लवकरात लवकर मिळाले पाहिजे यासाठी शासनाकडून स्पष्टोक्ती येणे आवश्यक असून एक निश्चित कार्यक्रम करून या सर्वसामान्य नागरिकांचे पैसे परत मिळण्याची आवश्यकता आहे आणि याच्या पुढच्या कालावधीमध्ये असे घोटाळे होऊ नयेत यासाठीसुद्धा शासनाने पुन्हा धडक कार्यक्रम हाती घ्यावा, अशीही मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी सभागृहात केली. (पान २ वर..)

## चिटफंड सुधारणा विधेयक विधानसभेत मंजूर



**नागपूर** : उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत मांडलेले चिटफंड (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक मंजूर करण्यात आले. राज्य शासनाकडील अपिलाचे अधिकार प्रशासकीय अधिकाऱ्यास प्रदान केल्याने अपील निकाली काढण्यातील विलंब टाळला जाणार आहे. त्यामुळे अपीलकर्त्यांचा वेळदेखील वाचणार आहे.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, चिटफंड अधिनियम १९८२च्या माध्यमातून शासनामार्फत सर्व चिटफंडांचे नियमन केले जाते. या अधिनियमात दुरुस्ती करण्यासाठी हे विधेयक मांडले आहे. सध्या वित्तमंत्र्यांकडे अपिलाचे अधिकार आहेत. वित्तमंत्र्यांकडील कामाच्या व्यापामुळे त्यांना अपिलांचे कामकाज चालविण्यासाठी पुरेसा वेळ देता येत नाही. या पार्श्वभूमीवर प्रक्रिया गतिमान होण्यासाठी अपिलाचे अधिकार राज्य कर उपायुक्त दर्जाचा अधिकारी असलेल्या सहनिबंधक या अधिकाऱ्यांकडे देण्यात येत आहेत.

चिटफंड चालवताना काही वेळा वाद निर्माण होतात. त्या वेळी चिटफंड चालवणाऱ्या कंपन्या कलम ६९नुसार राज्य कर विभागातील चिटस् सहनिबंधकांकडे दाद मागतात. सहनिबंधकांच्या निर्णयाने समाधान झाले नाही, तर कलम ७०नुसार त्यांच्या निर्णयाविरुद्ध दोन महिन्यांच्या मुदतीत वित्तमंत्र्यांकडे अपील करण्याची तरतूद आहे. या सुधारणेमुळे हे अधिकार खालच्या स्तरावर म्हणजेच सहनिबंधकांकडे राहणार असून त्यामुळे अपील निकाली काढण्याची प्रक्रिया वेगाने होण्यास मदत होईल.



## राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेच्या महाअंतिम फेरीचे शानदार उद्घाटन

### सांस्कृतिक चळवळीत पनवेलचाही सहभाग : परेश ठाकूर

**सिने-नाट्य क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती**



**पनवेल : प्रतिनिधी**

सांस्कृतिक चळवळीत पनवेल मागे राहू नये यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा रंगमंच आमचा कलाविष्कार तुमचा हे ब्रीदवाक्य घेऊन सुरू करण्यात आली, असे प्रतिपादन नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष व महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शुक्रवारी (दि. ८) स्पर्धेच्या उद्घाटनावेळी केले.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा या स्पर्धेचे दहावे वर्ष. स्पर्धेच्या महाअंतिम फेरीचे उद्घाटन शुक्रवारी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात झाले.

या समारंभास अभिनेते लेखक व दिग्दर्शक संजय मोने, अभिनेते विजय पाटकर, लेखक व दिग्दर्शक राजन ताम्हाणे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, शहराध्यक्ष अनिल भगत, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेवक राजू सोनी, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, अभिनेते भरत सावले, नाट्य परिषद पनवेल शाखेचे प्रमुख कार्यवाह श्यामनाथ पुंडे, सहकार्यवाह स्मिता गांधी, कोषाध्यक्ष अमोल खेर, भाजप सांस्कृतिक सेल जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, पनवेल शहराध्यक्ष वैभव बुवा, समन्वयक गणेश जगताप, चिन्मय समेळ, प्रीतम म्हात्रे, युवा मोर्चाचे शहराध्यक्ष सुमित झुंझारराव उपस्थित होते. (पान २ वर..)

## निवडक

### युपीएससीच्या सिव्हिल परीक्षेचा निकाल जाहीर

**नवी दिल्ली** : केंद्रीय लोकसेवा आयोगाने सिव्हिल सेवा मुख्य परीक्षा २०२३चा निकाल शुक्रवारी (दि. ८) जाहीर केला. १५ ते २४ सप्टेंबर या कालावधीत ही परीक्षा झाली होती. उमेदवारांचे अंतिम निकाल १५ दिवसांच्या आत पर्सनल इन्टरव्हूनंतर आयोगाच्या वेबसाईटवर अपलोड केले जाणार आहेत, जे ३० दिवसांसाठी वेबसाईटवर उपलब्ध राहतील.

### अभिनेते नईम सय्यद उर्फ ज्युनियर मेहमूद यांचे निधन



**मुंबई** : ज्युनियर मेहमूद या नावाने प्रसिद्ध असलेले अभिनेते नईम सय्यद यांचे शुक्रवारी (दि. ८) रात्री २ वाजता मुंबईत निधन झाले. ते पोटाच्या कर्करोगाने त्रस्त होते आणि गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती ठीक नव्हती. अखेर त्यांनी वयाच्या ६७व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला.

## खोपोलीत १०६ कोटींचे ड्रग्ज जप्त

### पोलिसांची कंपनीत कारवाई, त्रिकूट ताब्यात

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली पोलिसांनी ढेकू गावच्या हद्दीतील एका कंपनीत कारवाई करीत १०६ कोटी ५० लाख रुपयांचा अमली पदार्थ जप्त केला. यामुळे खोपोली–खालापूरसह रायगड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. याबाबत जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी शुक्रवारी (दि.८) खोपोली पोलीस ठाण्यात आयोजित पत्रकार परिषदेत माहिती दिली



खालापूर तालुक्यातील ढेकू येथील औद्योगिक वसाहतीतील कारखान्यात तपासणी करीत असताना इंडिया इलेक्ट्रिक फोर्स मॅन्युफॅक्चरिंग कंपनी या नावाचा बोर्ड लावून आतमध्ये मात्र अंचल केमिकल या नावाने केमिकल बनवण्याचा व्यवसाय सुरू होता. या कारखान्यात शासनाने प्रतिबंधित केलेले अमली पदार्थ बेकायदेशीरपणे तयार केले जात असल्याची माहिती खोपोली पोलीस ठाण्याचे अमलदार शेडगे व पाटील यांना प्राप्त झाली होती. उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम व खोपोली पोलीस ठाणे वरिष्ठ निरीक्षक शितल राऊत, अधिकारीवर्ग, अंमलदार यांनी गुरुवारी या कंपनीत छापा टाकला असता त्या ठिकाणी गैरप्रकार आढळून आला. (पान २ वर..)

### स्वातंत्र्यवीर सावरकरांचा अवमान

## प्रियांक खर्गेंचा पनवेल भाजपकडून तीव्र निषेध



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशसेवेसाठी आपले आयुष्य अर्पण करणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकरांचा अपमान कदापि सहन करणार नाही, असे स्पष्ट करून भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी काँग्रेसचे प्रियांक मल्लिकार्जुन खर्गे यांच्या पुतळ्याला जोडे मारत निषेध व्यक्त केला तसेच उद्धव ठाकरे या अवमानजनक वक्तव्याचा तीव्र निषेध करीत काँग्रेसला जाब विचारणार का? ज्या पद्धतीने भाजप रस्त्यावर उतरून व आंदोलन करून काँग्रेसचा निषेध करीत आहे त्या पद्धतीने उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि त्यांचा पक्ष काँग्रेसला रस्त्यावर उतरून विरोध करणार का? असा सवालही उपस्थित केला.

स्वातंत्र्यवीर सावरकरांबद्दल काँग्रेसचे प्रियांक मल्लिकार्जुन खर्गे यांनी आक्षेपार्ह विधान केले आहे. त्याच्या निषेधार्थ भारतीय जनता पक्ष पनवेलच्या वतीने शुक्रवारी (दि. ८) खर्गे यांच्या पुतळ्याला जोडे मारो आंदोलन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या वेळी फलक आणि पोस्टर घेऊन काँग्रेसविरोधात घोषणा देत खर्गेंच्या पुतळ्याला जोडे मारून तसेच पुतळा जाळून निषेध व्यक्त करण्यात आला.

या आंदोलनात भाजप जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, चारुशीला घरत, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, (पान २ वर..)

## डोंबिवलीत बुधवारपासून रंगणार आगरी महोत्सव

### मान्यवरांची लाभणार उपस्थिती; विविध कार्यक्रमांची रेलचेल




**डोंबिवली : प्रतिनिधी**

सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक, शैक्षणिक क्षेत्रातील भरीव कामगिरीमुळे लोकमान्यतेस पात्र ठरलेल्या आगरी युथ फोरम या सेवाभावी संस्थेच्या वतीने सन २००४पासून अखिल भारतीय आगरी महोत्सव या समाज सोहळ्याच्या आयोजनास सुरुवात केलेली आहे. सर्वांना हवाहवासा वाटणारा १९वा अखिल भारतीय महोत्सव १३ ते २० डिसेंबर या कालावधीत डोंबिवली पूर्व येथील श्री संत सावळाराम महाराज म्हात्रे क्रीडा संकुलात रंगणार आहे.

या महोत्सवाचे उद्घाटन समाजाचे ज्येष्ठ नेते माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी मंत्री जगन्नाथ पाटील, ज्येष्ठ सामाजिक नेते दशरथ पाटील यांच्या हस्ते बुधवारी (दि. १३) सायंकाळी ५ वाजता होणार आहे. उद्घाटन सोहळ्यासाठी समाजातील ज्येष्ठ नेते आजी–माजी लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. महोत्सव राज्य विधिमंडळ व लोकसभेच्या हिवाळी अधिवेशन काळात होत असल्याने असल्याने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील, राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार सर्वश्री गणपत गायकवाड, राजू पाटील, विश्वनाथ भोईर, आमदार किसन कथोरे व इतर लोकप्रतिनिधी महोत्सवाला शुभेच्छा भेट देणार आहेत.

अखिल भारतीय आगरी महोत्सव म्हणजे एक आनंदाची पर्वणी. या पर्वणीचा मनमुराद आनंद लुटण्यासाठी प्रचंड जनसागर उसळण्याची शक्यता आहे. हे लक्षात घेऊन महोत्सव समितीने अत्यंत नियोजनबद्ध अशी कार्यक्रमांची आखणी केलेली आहे. महोत्सव कालावधीत विविध क्षेत्रांतील मान्यवर, कलाकार यांची उपस्थिती लाभणार आहे. त्याची घोषणा महोत्सव मंचावरून एक दिवस अगोदर करण्यात येईल तसेच दररोज दोन महिलांना साडीच्या माध्यमातून पैठणीचा मान मिळणार आहे.

### दैनिक रामप्रहरचे व्यवस्थापक दादाराम मिसाळ यांना पुत्रशोक

**योगेश मिसाळ यांचे निधन**

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



दैनिक रामप्रहरचे व्यवस्थापक दादाराम मिसाळ यांचे ज्येष्ठ पुत्र योगेश (अजिंक्य) मिसाळ (वय २९, रा. कोकणगाव, जि. अहमदनगर) यांचे गुरुवारी (दि. ७) अकस्मात निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, दोन मुले, एक भाऊ व आप्तेष्ट असा मोठा परिवार आहे. योगेश मिसाळ यांच्या पार्थिवावर कोकणगाव येथे शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी विविध क्षेत्रांतील मान्यवरांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कै. योगेश मिसाळ यांचा दशक्रिया विधी १६ डिसेंबर रोजी आढळगाव येथे, तर उत्तरकार्य १९ डिसेंबर रोजी कोकणगाव येथे होणार आहे.

## चिंचवडमध्ये कारखान्यात आग; सहा महिलांचा मृत्यू

**पुणे : प्रतिनिधी**

चिंचवडमधील तळवडे येथील स्पार्कल कॅण्डल तयार करण्याच्या कारखान्यात आग लागून सहा महिलांचा जागीच मृत्यू झाला. ही दुर्घटना शुक्रवारी (दि. ८) दुपारी ३ वाजता घडली. या दुर्घटनेत नऊ महिला व एक पुरुष कामगार गंभीर जखमी झाले असून त्यांना पुणे येथील ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

स्पार्कल कॅण्डल बनविण्याच्या ज्वलनशील पदार्थाला आग लागून स्फोट झाल्याने जागेवरच सहा महिलांचा मृत्यू झाला. आग इतकी भयंकर होती की मृतांची ओळख पटणे मुश्किल झाले होते. राणा इंजिनिअरिंगच्या कंपाऊंडमध्ये एका औद्योगिक शेडमध्ये हा छोटा कारखाना होता. रेडझोन असल्याने या भागात बहुतांश औद्योगिक शेड अनधिकृत आहेत.

अग्निशामक दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन आग विझवली तसेच जखमी आणि मृत महिलांना बाहेर काढले. महापालिका आयुक्त शेखर सिंह, पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी भेट देऊन घटनास्थळाची पाहणी केली. त्याचप्रमाणे लोकप्रतिनिधींही दाखल झाले.

गंभीर जखमींपैकी दोन महिलांना सुरुवातीलाच ससून रुग्णालयात पाठविण्यात आले होते. उर्वरित सात गंभीर महिला व एका पुरुषावर पिंपरीतील यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयात बर्न वॉर्ड नसल्याने प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी ससून रुग्णालयात पाठविण्यात आले.



**पनवेल : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील अकरावी वाणिज्य शाखेचा विद्यार्थी अविक मुखर्जी याने अकोला येथे झालेल्या राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत रौप्यपदक पटकावले आहे. याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अविकचे अभिनंदन करून कौतुक केले.**

# स्वातंत्र्यवीर सावरकरांचा अपमान उद्धव ठाकरेंना मान्य आहे का?

- **भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा सवाल**
- **प्रियांक खर्गेविरोधात भाजपतर्फे राज्यभर आंदोलन**

**मुंबई : प्रतिनिधी**

स्वातंत्र्यवीर सावरकरांचा काँग्रेसकडून वारंवार अपमान होत असताना उद्धव ठाकरे हे गप्प बसून आहेत. काँग्रेसकडून सावरकरांचा केला जाणारा अपमान उद्धव ठाकरेंना मान्य आहे का, असा सवाल भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी (दि. ८) नागपूर येथे केला.




कर्नाटकातील काँग्रेस सरकारचे मंत्री प्रियांक खर्गे यांनी केलेल्या सावरकरांच्या अवमानाच्या विरोधात नागपूर येथे भाजपतर्फे झालेल्या आंदोलनावेळी बावनकुळे बोलत होते. भाजप व महाराष्ट्रातील जनता सावरकरांचा अपमान कदापि सहन करणार नाही. प्रियांक खर्गे यांनी त्वरित आपले विधान मागे घेत जाहीर माफी मागावी, अशी मागणीही बावनकुळे यांनी यावेळी केली.

बावनकुळे म्हणाले की, उद्धव ठाकरे हे स्वत:ला हिंदुत्ववादी म्हणवून घेतात, मात्र खर्गे यांनी सावरकरांचा एवढा अपमान करूनही उद्धव ठाकरे गप्प आहेत. त्यांना सावरकरांचा, हिंदुत्वाचा हा अपमान मान्य आहे का याबाबत त्यांनी स्पष्ट भूमिका महाराष्ट्राच्या जनतेसमोर मांडावी.

स्वातंत्र्यवीर सावरकरांचा अपमान करणारे काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचे पुत्र प्रियांक खर्गे यांच्या विरोधात भारतीय जनता युवा मोर्चा च्या वतीने राज्यभर तीव्र आंदोलन करण्यात आले.

अनेक ठिकाणी भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी प्रियांक खर्गे यांचा पुतळा जाळून आपला संताप व्यक्त केला. मुंबईत भाजपा प्रदेश कार्यालयासमोर, दादर स्थानका बाहेर, बोरीवली येथील सावरकर उद्यान, ठाणे, पुणे, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, धुळे, अशा अनेक ठिकाणी भाजप कार्यकर्त्यांनी आंदोलन करत खर्गे यांचा तीव्र निषेध केला.

काही ठिकाणी प्रियांक खर्गे यांची प्रतीकात्मक अंत्ययात्रा काढून पुतळा दहन करण्यात आला. स्वातंत्र्यवीर सावरकरांचा विजय असो, हिंदू संघटक सावरकरजी का अपमान नहीं सहेगा हिंदुस्थान, प्रियांक खर्गे मुर्दाबाद, भारतमाता की जय आदी घोषणा देऊन कार्यकर्त्यांनी वातावरण दणाणून टाकले. काही ठिकाणी वीर सावरकरांचा अपमान, उबाठा सेनेची साथ असे फलक हाती घेत उद्धव ठाकरे यांचादेखील निषेध करण्यात आला.

# महाराष्ट्र विधान परिषदेची कामगिरी मार्गदर्शक –मुख्यमंत्री



**नागपूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधान परिषदेचे कामकाज पुढील पिढीला मार्गदर्शक ठरणारे आहे. परिषदेतील चर्चा या देशाला नेहमीच मार्गदर्शक ठरल्या आहेत. या सकारात्मक चर्चांच्या माध्यमातून राज्याच्या विकासाला चालना देऊ या, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

विधान परिषद सभागृहात महाराष्ट्र विधान परिषद शतक महोत्सवानिमित्त 'महाराष्ट्र विधिमंडळ संसदीय वाटचालीत हिवाळी अधिवेशनाचे योगदान' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी मुख्यमंत्री शिंदे बोलत होते. या वेळी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, राजेंद्र गवई यांच्यासह विधान परिषद सदस्य, ज्येष्ठ पत्रकार उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, परिषद सभागृहामध्ये विचार मांडण्याची मुभा असते. जनतेला न्याय देणे, त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण सभागृहात येतो. महाराष्ट्र सर्व क्षेत्रासोबतच संसदीय कार्यप्रणालीमध्येही अग्रेसर आहे. ऐतिहासिक वास्तूमध्ये होत असलेला आजचा हा शतक महोत्सवी कार्यक्रम ऐतिहासिक आहे. राज्याची संसदीय परंपरा ही वैभवशाली असून जगाने गौरवलेली आहे. या परंपरेमध्ये नागपूरचे हिवाळी अधिवेशन हे संसदीय परंपरा समृद्ध करणारे असल्याचे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

या अधिवेशनाच्या माध्यमातून जनतेला न्याय देण्याचे, त्यांचे प्रश्न सोडवण्याचे काम करायचे आहे. या अधिवेशनाच्या माध्यमातून राज्याच्या विकासाची बेरीज करू या. विदर्भातील जनतेला या अधिवेशाकडून अनेक अपेक्षा आहेत. त्या पूर्ण करण्यासाठी सर्वांनी काम करू या. सर्वांनीच हे अधिवेशन गांभीर्याने घ्यावे. या अधिवेशनाच्या माध्यमातून विदर्भातील सर्वसामान्यांना न्याय मिळावा ही आमची भावना आहे. विदर्भाला जोडणारे माध्यम हीच या अधिवेशनाची मोठी उपलब्धता असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

उपसभापती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, राज्याला महर्षी कर्वे, महात्मा जोतिराव फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची समाजप्रबोधनाची मोठी परंपरा लाभलेली आहे. त्यांच्या योगदानामुळेच राज्यात शिक्षण चळवळ यशस्वी झाली आहे. समाजप्रबोधनाची ही परंपरा जपण्याचे काम विधान परिषदेच्या माध्यमातून होत आहे. विधान परिषदेच्या आजपर्यंतच्या वाटचालीविषयी लवकरच पुस्तकही प्रकाशित करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी विधान परिषदेच्या आतापर्यंतच्या वाटचालीचा आढावा घेतला.

विधान परिषदेचे महत्व सांगताना विरोधी पक्षनेते वडेट्टीवार म्हणाले की, परिषदेमुळे शिक्षक, पदवीधर, लेखक, कवी, साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते, खेळाडूंना प्रतिनिधित्व मिळाले आहे. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते दानवे यांनी चर्चासत्राच्या कार्यक्रमास शुभेच्छा देताना या अधिवेशनाचे सर्वांनाच कुतुहल असल्याचे सांगितले. कार्यक्रमावेळी ज्येष्ठ पत्रकार व सदस्यांना मुख्यमंत्री शिंदे व उपसभापती डॉ. गोऱ्हे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व मानपत्र देऊन गौरविण्यात आले.



**मुंबई : संत संताजी जगनाडे महाराज यांच्या जयंतीनिमित्त मंत्रालयात सामान्य प्रशासन विभागाच्या उपसचिव रोहिणी पाटील यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी मंत्रालयातील अधिकारी आणि कर्मचारी यांनी संत जगनाडे महाराजांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून वंदन केले.**



**नवी मुंबई : महापालिकेच्या वतीने संत संताजी जगनाडे महाराज जयंतीनिमित्त महापालिका मुख्यालयातील ॲम्फिथिएटर येथे प्रशासन विभागाचे उपायुक्त शरद पवार यांच्या हस्ते प्रतिमा पूजन झाले. या वेळी अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.**

## निवासी आश्रमशाळांमधील २८२ पदे भरण्याची प्रक्रिया सुरू

**नागपूर : प्रतिनिधी**

राज्यात इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत एकूण ९७७ खासगी अनुदानित आश्रमशाळा चालविण्यात येतात. या आश्रमशाळांना शालेय पोषण, इमारत भाडे आणि वेतन अशा तीन भागात अनुदान देण्यात येत आहे. यावर्षी २२५ कोटी रुपयांच्या तरतुदीपैकी आतापर्यंत १८० कोटी रुपयांचे वितरण करण्यात आले आहे.

या आश्रमशाळांमध्ये एकूण दोन लाख २३ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या शाळांमध्ये विज्ञान आणि गणित विषय शिकविण्यासाठी २८२ पदे भरण्यास मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली असून पदभरतीची प्रक्रिया सुरू करण्यात आली असल्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

सदस्य विकास ठाकरे यांनी यासंदर्भातील प्रश्न उपस्थित केला होता. या अनुषंगाने विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी रिक्त पदे भरण्याबाबत विचारलेल्या प्रश्नाबाबत मंत्री सावे म्हणाले की, सर्व आश्रमशाळांमधील रिक्त पदे त्वरीत भरण्यात येतील. येत्या जानेवारीपर्यंत राज्यात ५२ वसतिगृहे सुरू करण्यात येणार असून मोठ्या शहरात भाडे अधिक असल्याने ते वाढवून मिळण्यास शासनाकडे मागणी करण्यात आली आहे. ती मान्य झाल्यानंतर या शहरांमध्येदेखील उर्वरित शाळा सुरू करण्यात येतील. विद्यार्थ्यांसाठी आधार योजनेची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली असून ६०० विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळणार आहे.

# महाडमधील मुस्लिम बांधव, महिलांचा भाजपमध्ये प्रवेश



**महाड : प्रतिनिधी**

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकर्तुत्वाने प्रभावीत होऊन कोट आळी, देशमुख मोहल्ला आणि कुसगावमधील असंख्य मुस्लिम बांधव आणि महिला भगिनींनी महाड येथे भाजपात जाहीर प्रवेश केला. या वेळी जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर यांनी त्यांचे पक्षात स्वागत करून त्यांना पदांच्या जबाबदारी दिल्या.

पासमंदा मंच या भाजपच्या संघटनेचे अशरफ शेकहुसेन काझी व बशिर चौगुले यांच्या विशेष प्रयत्नातून महाड शहरातील कोट आळी देशमुख मोहल्ला येथील इकबाल शहा, फरान माटवणकर, दानिश चिलवान, मुस्कान गणतारे, फजिला काझी, सुगरा काझी, अंजुमन ठोकले, हुसेन काझी, कुद्दुस पानसारी, नाजिया पठान, सोफीया सिद्दीकी, रुकसेल सिद्दीकी, अंजुमन पठान सह अनेकांनी भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला. या वेळी बिपीन महामुणकर यांनी स्वागत करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यक्षम नेतृत्वावर आता मुस्लिम आणि अल्पसंख्यांक यांचा विश्वास निर्माण झाला आहे असे सांगितले. मोदी हेच या देशाला महाशक्ती बणवुशकतात असा विश्वास अशरफ काझी यांनी व्यक्त केला.

दरम्यान, इकबाल शहा यांना अल्पसंख्याक सेलचे तालुकाध्यक्ष, दानिश चिलवान देशमुख मोहल्ला अध्यक्ष, फजिला काझी कुसगाव महिला मोर्चा अध्यक्षा, सुगरा काझी कुसगाव महिला मोर्चा अध्यक्षा अशी जबाबदरी देण्यात आली. या वेळी जिल्हा कार्यकारिणी सदस्य संदीप ठोंबरे, योगेश झांजे, श्वेता ताडफळे, तालुका सरचिटणीस महेश शिंदे, शहर अध्यक्ष निलेश तळवटकर, अजित येरुणकर, पंचायत राजचे अंकुश देशमुख, प्रभाकर झांजे, विश्वतेज भोसले, सुहास कुडपाने, किशोर जामदार, प्रिया खोडके, संतोष देशमुख, विकास दरेकर, आशिष दळवी, सागर हिरवे, योगेश दळवी, सुरज बामणे, रिषभ जैन, राकेश वाघ, प्रमोद पवार, राकेश थरवळ, प्रसाद हटकर आदी भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# विजय आर्मी स्कूलमध्ये महापरिनिर्वाण दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विजय आर्मी स्कूल चिखले पनवेल येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन सोहळा साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे उपप्राचार्य सोपान पाटील सर हे अध्यक्ष होते तर प्रमुख पाहुणे पर्यवेक्षक एन एल पाटील हे होते.

या वेळी उपप्राचार्य सोपान पाटील, पर्यवेक्षक एन एल पाटील, ज्येष्ठ शिक्षक श्री. साळुंखे यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे मौल्यवान विचार विद्यार्थ्यांना विशद केले. तसेच सुनील पवार यांनी आपल्या प्रास्ताविकमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व तत्वज्ञान सध्याच्या कालावधीत विद्यार्थ्यांना कसे मार्गदर्शक ठरतील याविषयी माहिती सांगितली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी. टी. पाटील यांनी केले व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन जयश्री पवार यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य मिळाले.



**पान १ वरुन**

## उरण चिटफंड प्रकरण विधिमंडळात

यावर उत्तर देताना राज्याचे गृह व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, उरण येथील चिटफंड प्रकरणात पैसे दुप्पट करून देतो अशा प्रकारचे आमिष दाखवून मोठ्या प्रमाणात लोकांची त्या ठिकाणी लुबाडणूक झाली आहे. या संदर्भात पोलिसांनी कारवाई केली. या प्रकरणातील मुख्य आरोपी सतीश गावंडला सत्र न्यायालयाने जामीन दिला होता, पण त्या जामिनाविरुद्ध अपील करून तो जामीन रद्द करीत त्याला पुन्हा अटक करण्यात आलेली आहे. याच्यामध्ये आता जे काही मुद्देमाल जप्त केले आहे त्यामध्ये नऊ कोटी रुपये रोकड, बँक खात्यात १० कोटी रुपये, दीड कोटी रुपयांचे फ्लॅट व वाहने अशी मालमत्ता जप्त करण्यात आली आहे तसेच ठेवीदारांचे हितसंबंध संरक्षण अधिनियम १९९९ अंतर्गत प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. त्या अनुषंगाने या सर्व मालमत्तेची विल्हेवाट लावून ठेवीदारांना त्यांचे पैसे परत करण्याची कारवाई लवकरात लवकर करण्यात येईल आणि त्यासाठी पुढच्या तीन महिन्यात कायद्यानुसार लिक्विडिशन मालमता विक्री करण्यासाठी सक्षम अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात येईल.

दरम्यान, आतापर्यंत सतीश गावंड याला अटक आणि जप्ती होण्यापलीकडे विशेष कारवाई झाली नव्हती आणि ठेवीदारांचे पैसे मिळण्याची अपेक्षाही धूसर होती, परंतु आज आमदार प्रशांत ठाकूर यांनी नागपूर येथे हिवाळी अधिवेशनात मांडलेला प्रश्न ठेवीदारांच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरला. त्यावर राज्याचे गृह व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेली ठोस भूमिका ठेवीदारांना पैसे मिळण्यासाठी सुकर ठरणार आहे.

## राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेच्या महाअंतिम फेरीचे शानदार उद्घाटन

या वेळी परेश ठाकूर यांनी पुढे म्हटले की, अटल करंडक एकांकिका स्पर्धेचे यश हे कलारसिक आणि स्पर्धक यांच्यामुळे आहे. महाराष्ट्रीय मनामध्ये मराठी नाटक रूजले. पनवेल महापालिका नवीन आहे. राज्यात नाट्यचळवळ उभी राहत असताना या संस्कृतिक चळवळीत पनवेल मागे राहून पोकळी निर्माण होऊ नये यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली श्यामनाथ पुंडे, अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ व सहकारी काम करीत असल्याने ही चळवळ योग्य दिशेने जात आहे.

दरम्यान, ठाण्याच्या व्हाईट लाईट संस्थेच्या अनोळखी या एकांकिकेने महाअंतिम फेरीस सुरुवात झाली. यामध्ये प्रमुख भूमिका प्रसाद थोरवे आणि आरती दळवी यांनी साकारली. त्यांना कल्पेश देवकर, अंकिता कालेकर आणि विनिता कर्वे–लाडे यांनी साथ दिली. ही एकांकिका कवी सौमित्र यांच्या कवितेवर आधारित आहे. यामध्ये स्त्री प्रेयसी आणि आई ही नाती दाखवताना एका प्रसंगातून दुसऱ्या प्रसंगात जाताना कोठेही विस्कळीत वाटले नाही. 'मार्सो'च्या कथेतील पात्र भारतात दाखवताना लेखकाने त्यात दाखवलेले पात्र भारतीय भावना जपणारे वाटत असल्याची प्रतिक्रिया कवी, दिग्दर्शक दयाराम निंबोळकर यांनी दिली.

या स्पर्धेतील विजेत्या एकांकिकेला एक लाख रुपये आणि मानाचा अटल करंडक देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे इतरही पारितोषिके आहेत, तर यंदाच्या गौरव रंगभूमी पुरस्काराने ज्येष्ठ रंगकर्मी पद्मश्री डॉ. मोहन आगाशे यांना रविवारी पारितोषिक वितरण समारंभावेळी सन्मानित करण्यात येणार आहे.

## खोपोलीत १०६ कोटींचे ड्रग्ज जप्त

पोलीस पथकाने कंपनीत प्रवेश केल्यानंतर कंपनीचालकांकडे या ठिकाणी रासायनिक पदार्थ निर्मिती करण्यासाठी आवश्यक असणारा शासनाचा कोणताही योग्य परवाना मिळून आला नाही. त्या ठिकाणी उग्र वास येत असल्याने व काही कच्चा माल तसेच त्याच्यावर प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक साधन सामुग्री असेंबल केल्याचे दिसून आले. तयार पक्का माल असलेली पावडर ही तपासणी केली असता हा एमडी म्हणजेच मेथड्रॉम असल्याचे निष्पन्न झाल्याचे पोलीस अधीक्षक घार्गे यांनी सांगितले. या प्रकरणी गुंगीकारक औषधी द्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यात आली.

या कारवाईदरम्यान १०७ कोटी ५० लाख रुपये किमतीची एकूण ८५ किलो २०० ग्रॅम वजनाची एमडी पावडर तसेच १५ लाख ३७ हजार ३७७ रुपये किमतीची किमती पावडर बनवण्यासाठी वापरण्यात येणारी रसायने आणि ६५ लाख रुपये किमतीची रासायनिक प्रक्रियेसाठी असेंबल केलेली साधनसामग्री असा माल खोपोली पोलिसांनी जप्त केला आहे. हा कच्चामाल कुठून आला तसेच तयार माल कुठे पाठविला जातो याबाबत पुढील तपास सुरू असल्याचे पोलीस अधीक्षकांनी सांगितले. त्याचप्रमाणे औद्योगिक पट्ट्यातील ज्या ज्या बंद पडलेल्या कारखाने आहेत त्याच्या संदर्भात एमआयडीसी व अन्न आणि औषध प्रशासन यांच्याशी चर्चा सुरू असल्याचीही माहिती दिली.

## प्रियांक खर्गेंचा पनवेल भाजपकडून तीव्र निषेध

ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, जय भारतीय जनरल कामगार संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, सुनील घरत, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, माजी नगरसेविका दर्शना भोईर, ॲड. वृषाली वाघमारे, रूचिता लोंढे, भाजपचे पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, मोतीलाल कोळी, रवी नाईक, भीमराव पोवार, महिला मोर्चाच्या शहराध्यक्ष राजश्री वावेकर, युवा मोर्चा शहराध्यक्ष सुमित झुंजारराव, उपाध्यक्ष प्रीतम म्हात्रे, केदार भगत, चिटणीस रूपेश नागवेकर, युवा नेते प्रतिक बहिरा, सोशल मीडिया सेल शहर संयोजक प्रसाद हनुमंते, प्रभाग १८चे अध्यक्ष महेश सरदेसाई, अक्षय सिंग, प्रवीण मोरबाळे, रोशन ठाकूर, सुनीता गुरव, शांताराम महाडिक, दिनेश धवळे यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# पनवेल मनपाच्या भरती परीक्षेला प्रारंभ

## ४१ संवर्गातील ३७७ विविध पदे भरणार



**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेच्या ४१ संवर्गातील ३७७ विविध पदांची ऑनलाइन परीक्षा शुक्रवार (दि. ८)पासून सुरू होत असून, ही परीक्षा चार दिवस विविध केंद्रांवर सुरू असणार आहे. दरम्यान, पनवेल महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक गणेश देशमुख यांनी रसायनी येथील पिल्लई एचओसीएल कॅम्पस या परीक्षा केंद्रांला सकाळी भेट देऊन परीक्षा केंद्राची पाहणी करून सर्व आवश्यक सोयी सुविधा अद्यावत असल्याची खातरजमा केली.

पनवेल महापालिकेच्या भरती परीक्षा पध्दती सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने पनवेल महापालिका मुख्यालय येथे कंट्रोल रुम तयार करण्यात आला आहे. त्यामध्ये टीसीएस कंपनींचे प्रतिनिधी तसेच विभागीय समन्वयक, तसेच अधिकारी व कर्मचारी सकाळी ७ वाजल्यापासून दिवसभर कार्यालयात कार्यरत आहे.

परिक्षा केंद्रांवर येणाऱ्या कोणत्याही तक्रारींचे तत्काळ निराकरण या महापालिका मुख्यालय कंट्रोल रूममधून करण्यात येत आहे. ८ डिसेंबर रोजीची परीक्षा ५७ केंद्रांवर सुरळितपणे घेण्यात आली. प्रत्येक परिक्षा केंद्रांवर पोलीस व्यवस्था, मोबाईल जॅमर, वैद्यकीय सुविधा, पिण्याच्या पाण्याची सोय इत्यादी सोय करण्यात आली होती.

राज्यभरात ५७ विविध केंद्रांवर होणाऱ्या परीक्षेला ५५ हजार २१४ उमेदवार बसणार आहेत. या परीक्षेवरील नियंत्रणासाठी ५७ राजपत्रित अधिकाऱ्यांसोबत ४४१ अधिकारी अथवा कर्मचारी यांच्या परीक्षा केंद्रांवर नेमणुका पनवेल महापालिकेमार्फत करण्यात आल्या आहेत.

# पनवेलमधून तीन बांगलादेशींना अटक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल भागात गेल्या काही वर्षांपासून बेकायदा वास्तव्यास असलेल्या तीन बांगलादेशी नागरिकांना पनवेल शहर पोलिसांनी अटक केली आहे.

अमीनूर शेख (वय ४१), इबाद शेख (वय २१) व कोहीनूर शेख (वय ३६) अशी या तिघांची नावे असून या तिघांनी पनवेलमध्ये वास्तव्यास असल्याचा पुरावा म्हणून महाराष्ट्र शासनाचे कौटुंबिक शिधापत्रिका बनवून घेतल्याचे उघडकीस आले आहे. पोलिसांनी या बांगलादेशी नागरिकांकडून रेशनकार्ड व त्यांचे मोबाइल फोन जप्त करून त्यांच्यावर पुढील कार्यवाहीला सुरुवात केली आहे.

पनवेलमधील एम. पी. केशव बिल्डिंगमध्ये काही बांगलादेशी नागरिक बेकायदा वास्तव्यास असल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे सहायक पोलीस निरीक्षक प्रकाश पवार व त्यांच्या पथकाने छापा मारून या तिघांना ताब्यात घेतले.

यानंतर पोलिसांनी त्यांची चौकशी केली असता, त्यांनी बांगलादेशातील बेकारीला कंटाळून काही वर्षांपूर्वी घुसखोरीच्या मार्गाने भारतात बेकायदा प्रवेश केल्याचे कबूल केले. तसेच, ते पनवेल भागात मिस्त्रीकाम, बिगारी काम व घरकाम करून राहत असल्याचे सांगितले. या तिघांच्या चौकशीत त्यांनी पनवेल भागात राज्य सरकारचे रेशनकार्ड बनवून घेतल्याचे उघडकीस आले आहे.

## निवडक

### रेल्वेच्या धडकेने तरुणाचा मृत्यू

**मोहोपाडा :** रेल्वेच्या ठोकरेने तरूणाचा मृत्यू झाल्याची घटना रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली असून सारसई गावच्या हद्दीत पेण-पनवेल रेल्वे लाइनवर मयत तरूण अविनाश बानासूर पवार (वय २०, रा. खुटलेवाडी, चावणे) सध्या राहणार सारसई, आपटा, शिराजमुल्ला यांच्या विटभट्टीवर राहत असून मयत तरूण हा दारूच्या नशेत रेल्वे लाइनवर शौचालयास गेला होता. पेण बाजूकडून पनवेल बाजूकडे जाणाऱ्या रेल्वेची ठोकर लागून गंभीर दुखापत होवून मयत झाला. याबाबत रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस अधिक तपास करीत असून गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

### समीर जाधव मुख्याधिकारीपदी



**उरण :** नगर परिषदेचे मुख्याधिकारी राहुल इंगळे यांची मुदतपूर्वच बदली झाली असून त्यांच्या जागी ठाणे महापालिकेचे सहाय्यक आयुक्त समीर जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राहुल इंगळे यांची वर्षभरापूर्वीच उरण मुख्याधिकारी पदी नियुक्ती करण्यात आली होती. त्यांच्या मनमिळावू, मितभाषी, पारदर्शक कारभारामुळे कामगार आणि जनमानसात त्यांनी चांगली छाप पाडली. नुकतीच राहुल इंगळे यांचा पदमुक्त आणि समीर जाधव यांचा पदभार स्वीकारण्याचा कार्यक्रम सोहळा पार पडला. या वेळी कनिष्ठ अभियंता झुंबर माने, आरोग्य निरीक्षक हरेश तेजी, कर्मचारी, नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.




**खारघर : स्वातंत्र्यवीर सावरकरांबद्दल काँग्रेसचे प्रियांक मल्लिकार्जुन खर्गे यांनी केलेल्या आक्षेपार्ह विधानाचा खारघर येथे भाजपने निषेध केला. मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हे जोडे मारो आंदोलन झाले. या वेळी भाजप नेते ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, नरेश ठाकूर तसेच किरण पाटील, गीता चौधरी, समीर कदम, अमर उपाध्याय, वासुदेव पाटील यांच्यासह भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.**




**कळंबोली : स्वातंत्र्यवीर सावरकरांबद्दल काँग्रेसचे प्रियांक मल्लिकार्जुन खर्गे यांनी केलेल्या आक्षेपार्ह विधानाचा कळंबोली येथे भाजपने निषेध केला. या वेळी मंडल अध्यक्ष रविनाथ पाटील, सरचिटणीस दिलीप बिस्ट, माजी नगरसेवक बबन मुकादम यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**



**कळंबोली : आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मागणीनुसार शहरातील केएल ५ सेक्टर २ येथील जोसेफ स्कूल ते कंपाऊंड डीपीप्रर्यंत केबल टाकण्याचे काम सुरू आहे. या कामाची भाजप कळंबोली मंडल अध्यक्ष रविनाथ पाटील यांनी पाहणी केली. या वेळी सरचिटणीस दिलीप बिस्ट उपस्थित होते.**



**पनवेल : महापालिकेच्या मुख्यालयात संत जगनाडे महाराज यांच्या जयंती निमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी आयुक्त तथा प्रशासक गणेश देशमुख, उपायुक्त गणेश शेटे, उपायुक्त कैलास गावडे, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी, अधीक्षक हरेश जाधव आदी उपस्थित होते.**

# उरणमध्ये ट्रान्सफॉर्मर चोरीच्या घटनांत वाढ

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यात ट्रान्सफॉर्मरमधील ऑईलची चोरी बरोबर ट्रान्सफॉर्मरच्या चोरीत सर्रासपणे वाढ होत आहे. त्यातच भेंडखळ ते करंजा खाडीकिनाऱ्या वरील कोस्टल रोड जवळील ट्रान्सफॉर्मर मधिल साहित्य चोरीस जाऊन फक्त सांगाडा पडल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.



उरण तालुक्यात औद्योगिकरण आणि नागरीकरण झपाट्याने वाढत आहे. अशा वाढत्या औद्योगिकरणातील प्रकल्पांना, रहिवाशांना विद्युत पुरवठा करण्याचे काम हे महावितरण कंपनी उरणच्या माध्यमातून करण्यात येत आहे. त्यासाठी ठिकठिकाणी महावितरण कंपनीच्या देखरेखीखाली विद्युत उपकरण म्हणून ट्रान्सफॉर्मर हे बसविले जातात हे विद्युत उपकरण त्या त्या ठिकाणा वरील विजेचा दाब कमी-जास्त करणे, सामान्यपणे वीज पुरवठा करणे हे मुख्य काम करत असतात. एकंदरीत ट्रान्सफॉर्मर हे आवश्यकतेनुसार वीजपुरवठा करण्याचे काम करतो.

एखाद्या परिसरातील लोकांना अधिक व्होल्टेज ऊर्जा आवश्यक असल्यास तिथे अधिक व्होल्टेज वीजपुरवठा हा बसविण्यात आलेल्या ट्रान्सफॉर्मर कडून केला जातो.अशा महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या ट्रान्सफॉर्मर मधिल ऑईलच्या चोरी बरोबर ट्रान्सफॉर्मरच्या चोरीत सर्रासपणे वाढ होत आहे. यातच भेंडखळ ते करंजा खाडीकिनाऱ्या वरील कोस्टल रोड जवळील ट्रान्सफॉर्मर मधिल साहित्य चोरीस जाऊन फक्त सांगाडा पडल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. उरण तालुक्यात मागील वर्षभरात अनेक ट्रान्सफॉर्मरच्या चोरीच्या घटना घडल्या आहेत.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात इन्फोबीज मासिकाचे प्रकाशन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य शास्त्र महाविद्यालयात शुक्रवारी (दि. ८) सकाळी १० वाजता व्यवसाय व्यवस्थापन व शिक्षण विभागाच्या वतीने इन्फोबीज या द्वितीय मासिकाचे अनावरण करण्यात आले.



या अनावरण सोहळ्यासाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे, डॉ. श्रद्धा भोमे प्राचार्य जे.के. कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्स, डॉ. एन. डी. माथूर जयपूर युनिव्हर्सिटी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड, डॉ. रित ठुले व्यवसाय व व्यवस्थापन शिक्षण विभाग प्रमुख व डॉ. महेश्वरी झिरपे समन्वयक अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष या सर्वांच्या हस्ते या द्वितीय इन्फोबीज मासिकाचे अनावरण करण्यात आले.

या मासिकाच्या अनावरणाचा प्रमुख उद्देश विद्यार्थ्यांमध्ये व्यवसाय व्यवस्थापनाविषयी वेगवेगळे लेख लिहिण्यासाठी प्रेरणा मिळावी तसेच त्यांच्या ज्ञानामध्ये भर पडावी व त्यांची मते लेखनाच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडता यावीत हे होते. या मासिकाच्या अनावर सोहळ्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी व विद्यार्थिनीनी उपस्थित राहून अनावरण सोहळ्याचा लाभ घेतला तसेच व्यवसाय व व्यवस्थापन शिक्षण विभागातील प्रा. अंकिता जांगीड, प्रा. रेवन शिंदे, प्रा. विशाल देशमुख, प्रा. दिव्या निंबोत्री व प्रा. आरती कागवाडे यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# बीसीटी विधी महाविद्यालयात एड्स जनजागृती सप्ताह साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयामध्ये आरोग्य आणि आरोग्याला चालना देण्याच्या समर्पित प्रयत्नात नुकताच एड्स जनजागृती सप्ताहाचा समारोप झाला.



१ ते ७ डिसेंबर २०२३ या कालावधीत आयोजित आठवडाभर चालणारी ही मोहीम महाविद्यालय, आरोग्य केंद्र सल्लागार समिती आणि राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) यांनी एकत्रितपणे राबवली होती. संपूर्ण आठवडाभर, विद्यार्थ्यांनी रेड क्रॉस फिट ऑन युनिफॉर्म उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला, एचआयव्ही/एड्स विरुद्धच्या लढ्यात एकतेचे प्रतीक म्हणून त्यांच्या गणवेशावर रेड क्रॉस धारण केला. या दृश्यमान वचनबद्धतेने केवळ आरोग्याला चालना देण्याची सामूहिक जबाबदारी म्हणून काम केले नाही तर महाविद्यालयीन समुदायामध्ये एचआयव्ही जनजागृती साधण्याचाही प्रयत्न केला. २ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ०९:२० वाजता महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये आयोजित करण्यात आलेला विशेष समारंभ जागरुकता सप्ताहातील एक महत्त्वाचा क्षण होता.

सहाय्यक प्रा. धनश्री योगेश कदम आणि एनएसएस कार्यक्रम अधिकारी सहाय्यक प्रा. राघव शर्मा यांनी प्रभारी प्राचार्य सानवी अभिषेक देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी व प्राध्यापकांनी एकत्रितपणे एड्स विरोधी शपथ घेतली. या शपथेमध्ये सुरक्षित पद्धतींचा प्रचार, मिथक दूर करणे आणि एचआयव्ही/एड्सने बाधित झालेल्यांना पाठिंबा देण्याच्या वचनबद्धतेवर जोर देण्यात आला.

एड्स जनजागृती सप्ताहादरम्यान आयोजित केलेल्या उपक्रमांनी महाविद्यालयीन समुदायावर कायमस्वरूपी प्रभाव टाकला. रेडक्रॉस उपक्रमाने मौल्यवान संभाषणांना सुरुवात केली, ज्यामुळे एचआयव्ही/एड्सची निंदा करण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले. एचआयव्ही/एड्सचे उच्चाटन करण्यासाठी आणि बाधित लोकांसाठी आश्वासक वातावरण निर्माण करण्याच्या सामूहिक जबाबदारीची एक मार्मिक आठवण म्हणून एड्सविरोधी शपथविधी सोहळा झाला.

# मंगळसूत्र खेचून चोरट्याचे पलायन

**पनवेल :** खारघर सेक्टर २०मध्ये राहणाऱ्या ४१ वर्षीय महिला चालण्यासाठी बाहेर पडल्या होत्या. साडेसातच्या सुमारास त्या सेक्टर २१मधील भगवती ग्रीन बिल्डिंगजवळ आल्या असताना, त्यांच्या पाठीमागून हेल्मेट घालून आलेल्या एका चोराने त्यांच्या गळ्यातील एक लाख २० हजार रुपये किमतीचे ३० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र खेचून स्कूटीवरून पलायन केले. या महिलेने रिक्षामधून त्याचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला. मात्र तो वेगात पळून गेला. त्यानंतर त्यांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# पनवेलमध्ये विविध स्पर्धा

**पनवेल : वार्ताहर**

भारत विकास परिषद ही एक राष्ट्रव्यापी अराजकीय सामाजिक संस्था आहे. संपर्क, सहयोग, संस्कार, सेवा आणि समर्पण ह्या पंचसुत्रावर आधारीत संस्थेचे विविध उपक्रम राबविले जातात.

संस्कार उपक्रमाअंतर्गत 'गुरू वंदन छात्र अभिनंदन', 'राष्ट्रीय समूहगान स्पर्धा' आणि 'भारत को जानो प्रश्नमंजुषा' असे तिन कार्यक्रम शालेय व शाखा स्तरावर घेण्यात येतात. यामधे पनवेल तालुक्यातील अग्रगण्य बहुतांश शाळा सहभागी होतात. क्षेत्रस्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजनामधे, कोकंण प्रांताचे प्रतिनिधित्व यावर्षी भारत विकास परिषद पनवेल शाखा करीत आहे. ही स्पर्धा रविवारी (दि. १०) सीकेटी महाविद्यालय पनवेल येथे आयोजित करण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी मुंबई, पश्चिम-महाराष्ट्र, कोंकण, गोवा, विदर्भ, देवगिरी, सौराष्ट्र आणि गुजरात अशा आठ प्रांतांचे ज्युनिअर व सिनियर गटातून प्रत्येकी दोन, दोन विद्यार्थी प्रतिनिधित्व करतील.

स्पर्धेला विविध प्रांतातील विद्यार्थी, त्यांचे पालक, शिक्षक, तसेच भारत विकास परिषदेचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत, असे शाखेच्या अध्यक्षा डॉ. कीर्ती समुद्र, सचिव पद्मजा कुलकर्णी, कोषाध्यक्ष शितल विचारे व संस्कार प्रोजेक्ट समन्वयक ज्योती कानिटकर यांनी सांगितले.

## संपादकीय

# वेबसाइटबंदी दिलासादायक

निवृत्त ज्येष्ठ नागरिक, सेवानिवृत्ती घेतलेल्या व्यक्ती वा गृहिणी या वर्गातील नागरिक कमाईच्या छोट्या-मोठ्या संधी शोधत असतात. समाजातील हा गरजवंत घटक हेरून त्यांना अर्धवेळ वा पूर्णवेळ नोकऱ्यांचे आमिष दाखवून त्यांची फसवणूक करणाऱ्या तसेच अन्य स्वरूपाचे आर्थिक गुन्हे करणाऱ्या १००हून अधिक वेबसाइट बंद करण्याची कारवाई केंद्र सरकारने अलीकडेच केली. ही कारवाई दिलासादायक असून नागरिकांनीही अशा फसवणुकीपासून सावध राहिले पाहिजे.

**थोडीफार कमाई करून आपणही कुटुंबाच्या उत्पन्नात भर घालावी असे वाटणारा एक वर्ग असतो. आयुष्यभर नोकरी करून संसाराचे गाडे ओढलेल्या निवृत्त मंडळींना रिकामपण डाचत असते. ते निवृत्तांसाठी कुठे काही कामाच्या संधी आहेत का याच्या शोधात असतात. निवृत्त ज्येष्ठ नागरिकांप्रमाणेच निरनिराळ्या कारणांमुळे साठी गाठण्याआधी सेवानिवृत्ती स्वीकारलेल्या व्यक्ती असोत वा परिस्थितीच्या रेट्यामुळे घरबसल्या उत्पन्नाचे मार्ग शोधणाऱ्या सुशिक्षित गृहिणी ही मंडळी हमखास 'अर्धवेळ/पूर्णवेळ नोकरी' असा मथळा असलेल्या जाहिरातींच्या जाळ्यात अडकतात. बरेचदा आर्थिक गरजांपोटी अशा जाहिराती दिसल्या की कुठलीही शंका न घेता तिथे दार ठोठावले जाते. अशा जाहिराती मग त्या वृत्तपत्रांतल्या असोत वा संकेतस्थळांवरच्या, कामाच्या शोधात असणाऱ्या गरजवंतांकडून पैसे उकळण्याचा धंदा करणाऱ्या लबाडांनी फेकलेले हे जाळेच बहुदा असते. काम हवे तर तुम्हाला नोंदणीसाठी आधी इतकी रक्कम भरावी लागेल या लिंकवर क्लिक करून नोंदणी रक्कम भरा, तुमच्या बँक खात्याच्या तपशीलांसह सगळी माहिती द्या, असे काहीही या संकेतस्थळांवर म्हटलेले असते. उत्पन्नाचे आकडे लुभावणारे असतात. रोज घरबसल्या कमवा १० हजार वगैरे काहीही. कामाचे स्वरूप अजिबातच सांगितले जात नाही. नुसती नावनोंदणीची प्रक्रिया. तरीही आशेपोटी अनेक जण या जाळ्यात फसतात. काही ठिकाणी तर त्याहीपेक्षा मोठे आमिष दाखवले जाते. इतकी छोटीशी रक्कम गुंतवा, आणि मोठी कमाई करा. सायबर गुन्हेगारीविषयी अनभिज्ञ असलेले लोक गुंतवणुकीचे अल्प स्वरूप पाहून धोका पत्करतात. सुरुवातीला थोडीशी कमाई हाती लागल्याने त्यांचा हुरूप वाढतो आणि मग ते मोठी रक्कम गुंतवून टाकतात. अशा प्रकारचे अनेक गुन्हे देशभरात मोठ्या प्रमाणात नोंदले जाऊ लागल्याने या मार्गाने लोकांची फसवणूक करणाऱ्या १००हून अधिक वेबसाइटवर केंद्र सरकारने नुकताच बंदीहुकूम बजावला. केंद्र सरकारच्या गृहमंत्रालयातर्फे ही कारवाई सुरू करण्यात आली. सायबर गुन्ह्यांना आळा बसावा याकरिता विविध उपाययोजना करण्याकरिता केंद्रीय गृह खात्यांतर्गत भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र स्थापन करण्यात आले आहे. या केंद्रासह राष्ट्रीय सायबर गुन्हे धोके विश्लेषण युनिटने ही फसवणूक करणारी संकेतस्थळे हुडकून काढून त्यांना ब्लॉक करण्याची शिफारस सरकारकडे केली होती. त्यानंतर इलेक्ट्रॉनिक आणि माहिती तंत्रज्ञान खात्याने आपल्या अधिकाराचा वापर करीत या वेबसाइट बंद करण्याची कारवाई केली. गुंतवणुकीतून चांगले उत्पन्न देण्याचे आमिष दाखवणाऱ्या बहुतांश वेबसाइट्स या परदेशातूनच चालवल्या जातात. अर्धवट माहितीच्या आधारे नव्या तंत्रज्ञानाच्या या मोहजालात सर्वसामान्य सहज फसतात. या अशा आर्थिक फसवणुकीतील रकमा बरेचदा देशाबाहेर पाठवल्या जातात. त्यामुळेच सरकारने नागरिकांना या अशा फसवणुकीबाबत अत्यंत सावध राहण्याचे आवाहन केले असून फसवणूक करणाऱ्यांनी वापरलेले दूरध्वनी क्रमांक आणि समाजमाध्यमांवरील त्यांच्या अकाऊंटचे तपशील नोंदवून ठेवून सायबर गुन्हेगारीविषयक काम करणाऱ्या सरकारी यंत्रणांना कळवण्याचे आवाहनही सरकारकडून करण्यात आले आहे.**

# उधाणाचे पाणी शिरून शेतजमीन होतेय पडीक



मुरूड तालुक्यात मोठ्या भरतीमुळे समुद्रालगत अथवा काही अंतरावर असणाऱ्या शेतजमिनीमध्ये समुद्राचे पाणी शिरल्यामुळे ही जमीन खारट होऊन नापीक बनण्याचे प्रमाण वाढले आहे. याचे प्रमुख कारण सद्य परिस्थितीत पाहणी केली असता असे दिसून आले की, फार पूर्वी खारभूमी विभागामार्फत बांधण्यात आलेले शेतीचे बांध वर्षानुवर्षे जुने झाल्याने या बंधाऱ्याची झीज झाली आहे.

एकदा बंधारा बांधला की, त्या ठिकाणची कधीही पाहणी न करणे, मातीचे बंधारे असल्याने मोठ्या भरतीमुळे काही वर्षांनी झीज होऊन या बंधाऱ्यांची उंची कमी होते. मग समुद्राचे पाणी या बंधाऱ्यावरून वाहून जाऊन संपूर्ण शेतीत पसरून जमीन खारट होण्यास मदत झाली आहे.

एखादा बंधारा फुटला अथवा मोठ्या भरतीमुळे बंधारा वाहून गेला आणि याची तक्रार खारभूमी विभागाकडे केली तरी तेथून मिळणार प्रतिसाद अल्प असतो. त्यामुळे वर्षानुवर्षे बंधारा फुटीर अवस्थेत असल्याने खारे पाणी जाऊन जाऊन ही शेती नापीक होण्यास मदत होत आहे. खारभूमी विभागाला असे बंधारे बांधण्यासाठी अल्प निधी उपलब्ध होत असतो. त्यामुळे नेमकीच कामे तीही फार धिम्या गतीने होत असतात. परिणामी भरतीचे पाणी सर्व दूरवर पोहचून जास्तीत जास्त क्षेत्र खारे होण्यास मदत होते.

उधाळामुळे शेतात पाणी घुसून नापीक झालेली जमीन पुन्हा लागवडी योग्य होण्यासाठी अत्यल्प भूधारकांना शासन स्तरावर आर्थिक सहाय्य मिळण्याची मागणी होत आहे. याबाबत ज्या शेतकऱ्यांची समुद्राच्या पाण्यामुळे शेती नापीक झाली आहे त्यांनी सांगितले की, एकतर आम्ही अल्पभूधारक असून शेतात खारे पाणी थांबण्यासाठी मातीचा मोठा बंधारा बांधण्याची आमची ऐपत नाही. शासनाचा खारभूमी विभाग आहे, परंतु येथे निधी फार कमी दिला जात असल्याने मातीचे बंधारे बांधण्याची कामे फार धीम्या गतीने होत आहेत. शासनाने या विभागाला मोठा निधी देणे आवश्यक असल्याचे मत अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केले आहे.

**खबरबात**
**संजय करडे**

मुरूड तालुक्याचे भौगोलिक क्षेत्र २६ हजार ५२५ हेक्टर इतके असून शहरी तीन किमी व ग्रामीण ४२ किमी आहे. सागर किनारा लाभलेल्या तालुक्यांत ७५ गावे व ७५ हजार लोकसंख्या आहे. भातशेती व मासेमारी हा पारंपरिक प्रमुख व्यवसाय केला जातो.

भातशेती क्षेत्र कागदोपत्री ३९०० हेक्टर असले तरी उधाणाने पाणी शेतात घुसल्याने सुमारे ८०० हेक्टर जमीन खारफुटी तसेच खाजणाने व्यापली आहे. म्हणजेच प्रत्यक्षात भातशेती क्षेत्र हे ३१०० हेक्टर भातशेती लागवडीसाठी योग्य असले तरी पडीक क्षेत्र जवळपास ३०० हेक्टर इतके भरेल. केवळ उत्पादन खर्च न परवडल्याने अत्यल्प भूधारकांनी शेती ओस ठेवल्याचे चित्र आहे. म्हणूनच अशा छोट्या शेतकऱ्यांना सरकारी पातळीवर प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य तसेच शेतीविषयक सल्ला दिल्यास हे पडीक क्षेत्र भातशेती खाली येऊ शकेल; अन्यथा हे प्रमाण दिवसेंदिवस वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. शेतीचे समुद्राच्या भीतीपासून संरक्षण करण्यासाठी मोठे बंधारे आवश्यक असून यासाठी शासनाने लक्ष घालण्याची गरज आहे. यावर मोठा निधीसुद्धा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. ज्या ठिकाणी मातीचे बंधारे फुटले आहेत त्याची त्वरित दुरुस्ती अथवा उपाययोजना होणे आवश्यक आहेत. अन्यथा जास्त वर्ष हा प्रश्न दुर्लक्षित राहिल्याने नापीक शेतीचे क्षेत्र दिवसागणिक वाढत आहे. हा सर्व शेतकऱ्यांना चिंतेचा विषय ठरला आहे.

खारआंबोली ग्रामपंचायतीचे माजी सरपंच व मोठी शेती असणारे शेतकरी मनोज कमाने यांनी सांगितले की, तालुक्यात समुद्राच्या पाण्यामुळे नापीक शेती होण्याचे प्रमाण वाढत आहे. एकतर येथील शेतकरी हा अल्पभूधारक आहे. म्हणजेच एखाद्याकडे २० गुंठे शेती आहे, परंतु समुद्राच्या पाण्यामुळे १० गुंठे बाधित क्षेत्र झाल्याने उर्वरित १० गुंठे वर शेती करून संपूर्ण परिवाराचे पालन पोषण करावे लागते. ते पाहता शासनाने बंधारे बांधून हा प्रश्न मार्गी लावला पाहिजे, अशी मागणी त्यांची आहे.

याबाबत तालुका कृषी मनीषा भुजबळ यांना विचारणा केली असता ते म्हणाले की, शेतीमध्ये समुद्राचे पाणी घुसून शेती नापीक होणे यासाठी कोठेही भरपाई देण्याची योजना कृषी विभागाकडे नाही. हा विषय खारभूमी विभागाशी संलग्न आहे. तेच हे प्रश्न सोडवू शकतात.

# आज आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचारविरोधी दिन

आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचारविरोधी दिन दरवर्षी ९ डिसेंबर रोजी साजरा केला जातो. हा दिवस प्रत्येक व्यक्तीस सक्रियपणे बोलण्यासाठी आणि इतरांच्या जीवनातील भ्रष्टाचाराविरुद्ध लढण्यासाठी एक स्मरण आहे. भ्रष्टाचारविरोधी भूमिका घेण्याच्या गरजेकडे लक्ष देण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी हा दिवस घोषित केला आहे.

आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचारविरोधी दिन भ्रष्टाचारविरोधी आणि शांतता, सुरक्षा आणि विकास यांच्यातील महत्त्वाचा दुवा हायलाइट करण्याचा प्रयत्न करतो. गुन्ह्यांचा मुकाबला करणे हा प्रत्येकाचा हक्क आणि जबाबदारी आहे. हा विश्वास त्याच्या मुळाशी आहे, कारण प्रत्येक व्यक्ती आणि संस्थेच्या सहभागाने, सहकार्यानेच आपण गुन्हेगारीच्या नकारात्मक परिणामांवर मात करू शकतो.

आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचारविरोधी दिवसानिमित्त भ्रष्टाचाराविरुद्ध जगाला एकत्र आणण्यासाठी राज्ये, सरकारी अधिकारी, नागरी सेवक, कायद्याची अंमलबजावणी करणारे अधिकारी, माध्यमांचे प्रतिनिधी, खासगी क्षेत्र, नागरी समाज, शैक्षणिक संस्था, जनता आणि तरुण यांची भूमिका आहे.

जगाला आज अनेक पिढ्यांमधील काही सर्वांत मोठ्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे-अशी आव्हाने जी जगभरातील लोकांसाठी समृद्धी आणि स्थिरता धोक्यात आणतात. भ्रष्टाचाराची पीडा त्यातल्या बहुतेकांमध्ये गुंफलेली आहे.

भ्रष्टाचाराचा समाजाच्या प्रत्येक पैलूवर नकारात्मक प्रभाव पडतो आणि त्याचा संघर्ष आणि अस्थिरतेशी खोलवर संबंध आहे. सामाजिक आणि आर्थिक विकासाला धोका निर्माण होतो आणि लोकशाही संस्था आणि कायद्याचे राज्य कमी होत आहे.

भ्रष्टाचार हा केवळ संघर्षालाच कारणीभूत ठरत नाही तर त्याचे मूळ कारण आहे. हे कायद्याचे राज्य कमी करून, गरिबी वाढवून, संसाधनांमध्ये बेकायदेशीर प्रवेश सुलभ करून आणि सशस्त्र संघर्षासाठी वित्तपुरवठा करून संघर्षाला उत्तेजन देते आणि शांतता प्रक्रियेस अडथळा आणते.

शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांची पूर्तता करायची असल्यास भ्रष्टाचार रोखणे, पारदर्शकतेला चालना देणे आणि संस्थांचे बळकटीकरण करणे अत्यावश्यक आहे.

संबंधित कायदे : माहितीचा अधिकार कायदा, २००५, भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, न्यायाधीश (तपास) कायदा, लोकपाल आणि लोकायुक्त कायदा २०१३, व्हिसलब्लोअर संरक्षण कायदा २०११, मनी लॉण्डरिंग प्रतिबंध कायदा, बेनामी व्यवहार (प्रतिबंध) कायदा इ.

**(साभार : मराठी वेबदुनिया)**

## बदलते तंत्रज्ञान

# गुगलचे आर्टिफिशियल इंटेलिजन्स मॉडेल लॉन्च

टेक कंपनी गुगल आता चॅट जीपीटीशी स्पर्धा करण्यासाठी तयार आहे. गुगलचे सीईओ सुंदर पिचाई यांनी त्यांच्या एक्स अकाउंटवरून एक व्हिडीओ आणि एक पोस्ट शेअर केली आहे. गुगलने आपले नवीन आर्टिफिशियल इंटेलिजन्स मॉडेल लाँच केले आहे. हे एआय टूल्स एखादी वस्तू किंवा गोष्ट माणसांप्रमाणे समजवून सांगण्यासाठी डिझाईन करण्यात आले आहे. जेमिनी हे एक नवीन कृत्रिम बुद्धिमत्ता मॉडेल आहे जे समजून घेणे, तर्क करणे, कोडिंग आणि नियोजन यांसारख्या कार्यांमध्ये इतर मॉडेल्सपेक्षा जास्त चांगले काम करते.




आर्टिफिशियल इंटेलिजन्स मॉडेल जेमिनी हे प्रो, अल्ट्रा आणि नॅनो या तीन आवृत्त्यांमध्ये सादर केले गेले आहे. प्रो व्हर्जन आधीच उपलब्ध आहे आणि अल्ट्रा व्हर्जन पुढच्या वर्षाच्या सुरुवातीला रिलीज होईल असे सांगण्यात येत आहे. गुगलने नवीन जेमिनी प्रोला त्याच्या चॅटबॉट बार्डसह एकत्रित केले आहे. जेमिनी प्रोची आवृत्ती चॅटबॉट 'Bard'मध्ये वापरली जाऊ शकते, जी भारतासह १७० देश आणि प्रदेशांमध्ये इंग्रजी भाषेत उपलब्ध असेल.

जेमिनी हे मॅसिव्ह मल्टीटास्क लँग्वेज अंडरस्टँडिंग मॉडेलवर आधारित आहे. जेमिनी हे गुगलच्या डीपमाईंड विभागाद्वारे विकसित मॅसिव्ह मल्टीटास्क लँग्वेज अंडरस्टँडिंग मॉडेलवर आधारित आहे. तसेच हे मॉडेल प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी ५७ भाषा वापरते. जेमिनी मॉडेलच्या अल्ट्रा व्हेरिएंटने ३२ पैकी ३० बेंचमार्क चाचण्यांमध्ये चॅट जीपीटी ४ला मागे टाकले. जेमिनी प्रोने चॅट जीपीटीच्या मोफत आवृत्ती, जीपीटी ३.५ला आठपैकी सहा बेंचमार्क चाचण्यांमध्ये मागे टाकले आहे.

गुगलचा दावा आहे की, जेमिनी ओपन एआयच्या चॅट जीपीटी ४पेक्षाही चांगले आहे आणि अधिक चांगले कामसुद्धा करू शकते. नवीन एआय मॉडेल मजकूर, ऑडिओ, प्रतिमा आणि व्हिडीओ व इतर अनेक प्रकारची माहिती सहजपणे समजू देण्यास मदत करेल. जेमिनी चॅटबॉट मजकूर आणि कोड तसेच प्रतिमा तयार करू शकतात आणि वाचूसुद्धा शकतात. ओपन एआय कंपनीच्या चॅट जीपीटी ४सह वापरकर्ते प्रतिमा तयार करू शकत नाहीत. जेमिनी मल्टीटास्किंग करण्यासदेखील सक्षम आहे आणि एकाच वेळी मजकूर प्रतिमा आणि कोडवर कार्य करू शकतो, तर चॅट जीपीटी वापरकर्ते एकाच वेळी मल्टीटास्किंग करू शकत नाहीत.

# समाजसुधारक अण्णासाहेब लठ्ठे



**निमित्त**

अण्णासाहेब बाबाजी लठ्ठे हे कोल्हापूर संस्थानचे दिवाण व मुंबई इलाख्याचे पहिले अर्थमंत्री. त्यांचा जन्म बाबाजी नरहर लठ्ठे व आदुबाई लठ्ठे या दाम्पत्यापोटी ९ डिसेंबर १८७८ रोजी कुरुंदवाड येथे झाला.

अण्णासाहेबांचे चौथीपर्यंतचे शिक्षण कुरुंदवाड येथे झाले. १८९६मध्ये ते सांगली हायस्कूलमधून मॅट्रिक पास झाले. त्यानंतर राजाराम कॉलेज, कोल्हापूर व डेक्कन कॉलेज, पुणे येथून त्यांनी पदवीपर्यंतचे शिक्षण घेतले. मुंबई विद्यापीठातून इंग्रजी व अर्थशास्त्र या विषयातील एमए (१९०५) व पुण्याच्या लॉ कॉलेजमधून एलएलबी ही पदवी (१९१६) त्यांनी प्राप्त केली. अण्णासाहेब लठ्ठे छत्रपती शाहूंच्या वसतिगृह चळवळीमुळे कोल्हापूरकडे आकर्षित झाले. १८९९मध्ये स्थापन झालेल्या दक्षिण भारत जैन सभेच्या स्थापनेत त्यांचा पुढाकार होता. क्विन व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग व दिगंबर जैन बोर्डिंग यांच्या स्थापनेत त्यांनी छत्रपती शाहूंना मदत केली.

जैन समाजातील धार्मिक रूढी, परंपरा व वाईट चालीरीतींना विरोध करून महिला परिषद, स्त्रीशिक्षण विभाग आणि जैन श्राविकाश्रम यांच्या माध्यमातून स्त्रियांना शिक्षण देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. छत्रपती शाहूंची वसतिगृह चळवळ जैन वसतिगृहांच्या माध्यमांतून महाराष्ट्र व कर्नाटकात पसरवली. कोल्हापूर संस्थानात ॲक्टींग सिटी मॅजिस्ट्रेट म्हणून त्यांनी काम केले. १९०८मध्ये दलितांच्या शिक्षणप्रसारासाठी 'मिस क्लार्क होस्टेल'ची स्थापना झाली. त्या वेळी सोसायटी फॉर द प्रमोशन ऑफ डिस्प्रेड क्लास या दलितांसाठी काम करणाऱ्या संस्थेची स्थापना केली. शिक्षणाधिकारी असताना (१९११-१४) परंपरागत शिक्षक पद्धतीद्वारे शिक्षकांना वतने देऊन त्यांच्यावर बहुजन समाजाच्या शिक्षणाची जबाबदारी सोपवली. अशिक्षित पाटलांना गावच्या कारभारासाठी शहाणे करण्यासाठी पाटलांची शाळा हा अभिनव प्रयोग सुरू केला (१९११). वैदिक शाळा, शेतकी शाळा, वसतिगृह चळवळ, मुला-मुलींना शिष्यवृत्ती व फीमाफी, शाळातपासणी पद्धती या लठ्ठेंनी सुरू केलेल्या योजना आहेत.

कोल्हापुरात सत्यशोधक समाजाची स्थापना करण्यात व ठिकठिकाणी सत्यशोधकीय परिषदा भरविण्यात लठ्ठेंचा पुढाकार होता. मद्रास प्रांतात जस्टीस पार्टीचे मुखपत्र म्हणून जस्टीस या वृत्तपत्राप्रमाणे मुंबई प्रांतात ब्राम्हणेतर समाजाचे डेक्कन रयत हे वृत्तपत्र ब्राम्हणेतरांची मते ब्रिटिश अधिकार्यांना कळावीत म्हणून ते इंग्रजीत चालवीत. हा ब्राम्हणेतर पत्रकारितेचा उगम होता. १९२०मध्ये हुबळी येथे त्यांनी राजकीय व सामाजिक परिषदेचे आयोजन केले. सत्यशोधक समाजाचे परिवर्तन झाल्यावर १९२०च्या मध्यवर्ती कायदेमंडळाच्या निवडणुकीत ते बेळगाव जिल्हा ब्राम्हणेतर पक्षातर्फे मध्यवर्ती कायदेमंडळात निवडून गेले. तेथे त्यांनी आपली मते आग्रहाने मांडली. केंद्रीय कायदेमंडळात त्यांनी 'जोशी वतन बिल' मांडले (१९२१), परंतु ते नामंजूर झाले. हेच बिल पुढे १९२६ साली रावसाहेब बोले यांनी मुंबई कायदेमंडळामध्ये मान्य करून घेतले. या समाजसुधारकाचे १६ मे १९५० रोजी निधन झाले.

लठ्ठे यांचे इंग्रजी, मराठी, कन्नड भाषेवर प्रभुत्व होते. त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले. जैन धर्माचा परिचय (१९०५), हिंदुस्थानातील ब्रिटिश साम्राज्याचा उदय (१९१४), मेमरिज ऑफ हिज हायनेस छ. शाहू महाराज ऑफ कोल्हापूर खंड १ व २ (१९२४), छ. शाहू महाराजांच्या आठवणी (१९२५), भारतीय संस्थानांचे प्रश्न (इंग्रजी-१९२९; मराठी-१९४५), जगाची संघटित राज्यघटना (१९३१), माझ्या विलायतेच्या आठवणी (१९३४) हे त्यांचे उल्लेखनीय ग्रंथ होत.

**(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**




सातारा : अवकाळी पावसाचे ढग सरल्याने शेतकरी पुन्हा एकदा शेती कामांमध्ये गुंतला आहे. (छाया : तन्वी पवार)

## आरोग्य प्रहर

# हिवाळ्यात व्हिटॅमिन-डीची जाणवते कमतरता, काळजी घ्या!

हिवाळ्यात व्हिटॅमिन डीची कमतरता जाणवत असते. हाडांना मजबूत करण्यासाठी व्हिटॅमिन डीची खूप गरज असते. शरीरात याच्या कमतरतेने कॅल्शियमचे अब्जॉर्शन चांगल्या पद्धतीने होत नाही. त्यामुळे हाडे कमजोर होतात. हिवाळ्यात व्हिटॅमिन डीची कमतरता होण्याची जादा शक्यता असते. त्यामुळे आरोग्य धोक्यात येऊ शकते. तर चला पाहूयात शरीरात व्हिटॅमिन डीची कमतरता कशी भरुन काढायची ते पाहूयात..



व्हिटॅमिन डी हाडांसाठी तसेच रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी अतिशय गरजेचे आहे. लहान मुलांमध्ये व्हिटॅमिन डीच्या कमतरतेने त्यांची वाढ खुंटणे आणि हाडे कमजोर होण्यासारखे आजार होतात. त्यामुळे त्यांच्या संपूर्ण जीवनावर नकारात्मक प्रभाव होतो. आर्थरायटिसच्या रुग्णांसाठीही व्हिटॅमिन डी गरजेचे असते. त्याच्या अभावी संधीवातात हाडे कमजोर होऊन सांधे दुखू लागतात. व्हिटॅमिन-डी ला 'सनशाईन व्हिटॅमिन' म्हटले जाते, कारण याचा सर्वाधित स्रोत सूर्यप्रकाश आहे. याच्या कमतरतेने मानसिक आरोग्यावरदेखील परिणाम होतात. डिप्रेशन येऊ शकते. हिवाळ्यात ऊन कमी असते. थंडीपासून वाचण्यासाठी आपण घरातून बाहेर पडत नाही तसेच सन प्रोटेक्शनच्या नादात निसर्गातून मोफत मिळणाऱ्या या व्हिटॅमिन डीला पारखे होतो.

रोज थोडावर सुर्यप्रकाशात फिरावे त्यामुळे शरीरासाठी व्हिटॅमिन डी मिळेल. सुर्याचा थेट प्रकाश शरीरावर पडल्याने व्हिटॅमिन डी तयार होते. त्यामुळे थोडावेळ ऊन्हात बसावे.

तुम्ही सकस आहार घ्यायला हवा, तसेच सी फूडमध्ये अधिक प्रमाणात व्हिटॅमिन असते. टूना (कुपा) , सालमन (रावस) आणि मॅकरल (बांगडा) या माशांमध्ये डी व्हिटॅमिनचा भरपूर असते. यांचा आपल्या आहारात समावेश केल्यास व्हिटॅमिन डीची कमतरता भरून काढता येते.

फोर्टिफाईड फूड म्हणजे त्यात पोषकतत्वांना स्वतंत्रपणे टाकून विकले जाते. काही फूड आयटम्समध्ये व्हिटॅमिन डी टाकून विक्री केली जाते, जसे दूध, दही, सीरल्स, ज्यूस आदी. आपल्या आहारात याचा वापर केल्यास व्हिटॅमिन डीची कमतरता दूर होईल.

मशरुम खाण्यानेदेखील व्हिटॅमिन डीची कमी भरुन काढता येते. त्यामुळे आपल्या आहारात मशरुमचा वापर अधिकाअधिक करावा. त्यामुळे आरोग्यात लागलीच सुधारणा होण्यास मदत होईल.

# माणगावमधील काळ नदी प्रदूषित

## नागरिकांसह जलचरांना बसतोय फटका

**माणगाव : प्रतिनिधी**

निसर्गनिर्मित हजारो वर्षाची साक्ष देणारी आणि शेकडो गावांची पिण्याच्या पाण्याची तहान भागवणारी काळ नदी ही माणगावकरांचे काल, आज आणि उद्याचे वैभव आहे. ते वैभव जपण्यासाठी व पुढच्या पिढीला आरोग्य दृष्ट्या निरोगी ठेवण्यासाठी काळ नदी प्रदूषण मुक्त ठेवून माणगाव तालुका स्वच्छ ठेवणे हे सर्वांचेच कर्तव्य आहे, मात्र नागरिक या नदीकडे गांभीर्याने पाहण्याऐवजी दुर्लक्ष करीत आहेत.

कुंभे ते गोरेगावदरम्यानचे काळ नदीचे अंतर सुमारे ७५ किमी असून या नदीचा उगम कुंभे येथे झाला तर समारोप गोरेगाव येथे झाला. तर दुसरी नदी भिरा येथील देवकुंड धबधब्यातून तिचा उगम होतो. ती रवाळजे धरणातून पुढे रोहा बाजूकडे कुंडलिका नदीचा प्रवास सुरू होतो. ही नदी मानवनिर्मित चुकांमुळे ती विविध कारणांनी दुषित होत आहे. याचा फटका सर्वांनाच बसत आहे. वाढते औद्योगिकरण, शहरीकरण व नागरीकीकरण याचा या नदीला याचा मोठा फटका बसत आहे.

माणगावची काळ नदीही सह्याद्रीच्या कुशीतील कुंभे या गावातील जंगलातून स्वच्छ व जिवंत पाण्याचे झरे देत पुढे वाट काढीत अनेक गावातून ती शेकडो किलोमीटर अंतर पार करीत गोरेगावाजवळ खाडीच्या पाण्याला जावून मिळते. तिथे तिचा प्रवास संपतो. या अंतरात असणाऱ्या अनेक गावांची तहान भगवते. त्यामुळे अनेक गावांच्या जलवाहिन्या नळपाणी पुरवठा योजना या नदीवर कार्यान्वित आहेत. त्यामुळे या नदीचा विस्तार पाहता या नदीचा उपयोग नागरिकांना मोठ्या प्रमाणात झाला आहे. पाणी हेच जीवन असून निसर्गाने दिलेली ही देणगी मानवाने दुषित करण्याचे काम चालवले आहे. मराठवाड्यासह राज्यात अनेक ठिकाणी पाण्याचे दुर्भीक्ष असतांना कोकणामध्ये पाण्याला सुकाळ आहे, मात्र हे निसर्गनिर्मित पाणी अनेक ठिकाणी दुषित होऊन नागरिकांचे आरोग्य दिवसेंदिवस धोक्यात येत आहे. नागरिकांच्या चुकांमुळे काळ आणि कुंडलिका नदी दिवसेंदिवस दुषित होत आहे.



### शेतकऱ्यांच्या विविध पिकांची मदार

या नदीच्या पाण्यावर पाले व फळभाज्यांची पिके मोठ्या प्रमाणात शेतकरी घेतात. भात, कलिंगड, दुधीभोपळा, कारले, वांगी, भेंडी, मिरची, शिराली, घोसाळी, काळा भोपळा, शेवगा, काकडी, पालक, कोबी, मेथी, कोथिंबीर, मका, भुईमुग यासह अनेक पिके शेतकरी याच पाण्यावर प्रामुख्याने घेतात.

निजामपूर भागात दिली मुंबई कॉरीडॉर तसेच नव्याने येऊ घातलेल्या औद्योगिक प्रकल्पामुळे त्याचबरोबर गेल्या कांही दिवसापासून विळे भागाड औद्योगिक प्रकल्प सुरु झाल्याने या नदीवर वाढत्या औद्योगिकीकरणाचे आक्रमण होऊन पुरती संकटात सापडली आहे. त्याच बरोबर या नदी काठावर असणाऱ्या अनेक गावांमुळे ती प्रदूषित होऊ लागली आहे. विविध गावातील वाढते नागरीकीकरण, शहरीकरण, व्यापारीकरण, औद्योगिकीकरण या विविध कारणामुळे दुषित पाणी तसेच मुलमुत्र, गटारे यांचे पाणी या नदीत सोडले असल्याने ही गोडी नदी दिवसेंदिवस दुषित होत आहे. या प्रदुषणाचा फटका आता नागरिकांना नाहक सहन करावा लागत आहे. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य दिवसेंदिवस धोक्यात येत आहे. कावीळ, अतिसार, मलेरिया, डेंग्यू तसेच विविध जीवघेणे रोगाचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य कमी होत आहे. नुसती तहान नाही तर या नदीवर मोठ्या प्रमाणात मच्छिमारी ही केली जाते. अनेक खवय्ये खाऱ्या समुद्राच्या पाण्यातील मच्छीपेक्षा याच गोड्या पाण्यातील मच्छीला अधिक पसंती देतात.

ज्याप्रमाणे गोडे पाणी त्याचप्रमाणे मच्छीही गोडी असते. त्याच्या चवदार रसाचा आस्वाद घेणारे नागरिक या मच्छीला अधिक किंमत देतात. त्यामुळे या मच्छीमारामुळे ही नदी प्रदूषित होत आहे. कुंभे येथून गोरेगावपर्यंत ही नदी कुंभे, मांजरवणे, कांडेथर, साखल्याची वाडी, जिते, उंबर्डी, शिरवली, येलावडे, येरद, कडापे, कांदळगाव, कांदळगाव बुद्रुक, बोंडशेत, भाले, कोशींबळे, कडापेवाडी, चांदेवाडी, पाणस्पे, निजामपूर, कोस्ते बुद्रुक, मांडवकरवाडी, कोस्तेखुर्द, पाणोसे, साळवा, उतेखोल, भादाव, माणगाव, रिळे, पाचोळे, वावे, उणेगाव, कुंभार्ते, गांगवली गोरेगाव यासह कुंभे या स्वयंभू उगम स्थानाचे पश्चिमेकडील शेकडो महसुली गावे व त्या गावांच्या आदिवासी वाड्या, वस्त्यांची तहान भागवते.

# प्रियांक खर्गेविरोधात खोपोलीत निदर्शने

## स्वातंत्र्यवीर सावरकरांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्याचा भाजपकडून निषेध

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**



काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचे पुत्र, कर्नाटक सरकारमधील मंत्री प्रियांक खर्गे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा अवमान केला आहे. त्याचा निषेध करण्यासाठी व जाब विचारण्यासाठी शुक्रवार (दि. ८) सकाळी ११ वाजता दीपक चौक बाजारपेठ खोपोली येथे आंदोलन करण्यात आले.

या आंदोलना साठी भाजप शहर अध्यक्ष रमेश रेटरेकर सरचिटणीस राहुल जाधव, महिला मोर्चा उत्तर रायगड जिल्हा चिटणीस अश्विनी अत्रे, सुप्रिया नांदे, शहर उपाध्यक्ष दिलीप पवार, ज्येष्ठ नेते माजी नगरसेवक सुर्यकांत देशमुख, कर्जत विधान सभा विस्ताराक हेमंत नांदे, भटक्या विमुक्त आघाडी अध्यक्ष संतोष लोहार, वैद्यकीय कोकण विभाग उपाध्यक्ष डॉ. बबन नागरगोजे, जैन प्रकोष्टचे किर्ती ओसवाल, लालजी मिश्रा, हेमंत भाटिया, हिम्मतराव मोरे आदी भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# 'लोकअदालतीत सहभागी व्हा'

**पेण : प्रतिनिधी**

महावितरण पेण मंडळातील कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित करण्यात आलेले वीज ग्राहक तसेच वीज बिलाबाबत वाद व वीज चोरीचा न्यायालयात दाखल पूर्व व प्रलंबित प्रकरणाच्या थकबाकी व त्यावरील व्याज यांचा तडजोडीने निपटारा करण्याची तसेच पुढील कायदेशीर कारवाई टाळण्याची संधी आहे. अशा ग्राहकांना तालुका न्यायालय स्तरावर शनिवारी (दि. ९) आयोजित लोकअदालतमध्ये सहभागी होऊन या संधीचा फायदा घेण्याबाबत वीज ग्राहकांना आवाहन आहे.

पेण मंडळातील संबंधित ग्राहकांना ११ ते २ दरम्यान लोकअदालतीत सहभागी होण्याबाबत न्यायालयामार्फत नोटीस पाठवण्यात आल्या आहेत, अशी माहिती पेण मंडळाच्या सहाय्यक विधी अधिकारी जीवन बोडके यांनी दिली.


### जाहीर सूचना

याद्वारे **सूचना** देण्यात येत आहे की, खाली दिलेल्या **परिशिष्टा** मध्ये अधिक विशेषतः वर्णन केलेल्या मालमत्तेच्या संदर्भात आम्ही एकनाथ उकरडा दुधे ("**मालक**") यांच्या सदर मालमत्तेवरील मालकीहक्काची चौकशी करत आहोत.

सर्व किंवा कोणतीही व्यक्ती/ संस्था/ हिंदू अविभक्त कुटुंब/ कंपनी/ बँक/ फर्म/ असोसिएशन/ कर्जदार ज्यांचा कोणताही हिस्सा, हक्क, शीर्षक, दावा, आक्षेप, लाभ, मागणी आणि/ किंवा नमूद केलेल्या मालमत्तेच्या किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या संदर्भात विक्री, अदलाबदली, भाडेपट्टी, सब-लीज, परवाना, तात्पुरत्या जागा वापराचा परवाना, काळजी वाहू तत्वावर, कुळ हक्क, उप-भाडेपट्टा, असाइनमेंट, रिलीझ, त्याग, गहाण, वारसा, मृत्युपत्र, उत्तराधिकार, भेट, धारणाधिकार, बोजा, देखभाल, वहिवाट, तारण, ट्रस्ट, कब्जा, ताबा, कुटुंब व्यवस्था/तडजोड, खटला, लिस-पेंडन्स किंवा इतर कोणत्याही पद्धतीद्वारे कोणताही करार, दस्तऐवज, लेख, फरोक्तखत, सामंजस्य करार, मृत्युपत्र, व्यवस्थापत्र, कुलमुखत्यारपत्र, कोणत्याही न्यायालयाचे आदेश अथवा हुकूम, करार, विकासनाचे हक्क, भागीदारी, एफएसआय वापर करार किंवा इतर कोणत्याही प्रकारचे व स्वरूपाचे भार या अन्वये कोणत्याही अथवा कसल्याही प्रकारचे हक्क हितसंबंध असल्यास याद्वारे कागदोपत्री पुराव्यासह सार्वजनिक सूचना प्रसिद्ध झाल्यापासून **१४ (चौदा)** दिवसांच्या आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर खाली स्वाक्षरी करणार यांचेकडे ते लेखी कळवणे आवश्यक आहे. असा कोणताही दावा प्राप्त न झाल्यास, असा कोणताही दावा अस्तित्वात नाही किंवा तो माफ केला गेला आहे किंवा सोडला गेला आहे असे मानले जाईल.

**वर उल्लेखित परिशिष्ट**
**(मालमत्तेचे वर्णन)**

मौजे-नानोशी, ता-पनवेल, जिल्हा-रायगड, राज्य-महाराष्ट्र

| जमीन मालकाचे नाव/कबजेदार | सर्वे क्रमांक | हिसा क्रमांक | क्षेत्र हे.आर.पॉ |
|---|---|---|---|
| एकनाथ उकरडा दुधे | २१ | ० | १-१५-० |

म्हणजेच गाव नानोशी, तालुका पनवेल, जिल्हा रायगड तसेच तुकडी जिल्हा रायगड, मा. सह दुय्यम निबंधक पनवेल येथील सर्वे नं. २१ मधील अदमासे क्षेत्र १.१५ हेक्टर इतक्या जमिनीचा येथे असलेला वारसाप्राप्त संपद जमिनीचा संपूर्ण तुकडा.

आज दिनांक ०९ डिसेंबर २०२३ रोजी

दीपा बिष्ट
वकील

द्वारा. तिसरा मजला, सुनामा हाऊस, १४० ऑगस्ट क्रांती मार्ग, शालिमार हॉटेल समोर, केम्प्स कॉर्नर, मुंबई – ४०० ०२६. ईमेल: adv.deepabisht@gmail.com


# वाल्मिकी सहकारी पतसंस्था अध्यक्षपदी संतोष जमनु

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील मजगाव येथील वाल्मिकी नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी संतोष जमनु, तर उपाध्यक्षपदी रामकृष्ण अंबाजी यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली आहे. तर सचिव म्हणून विनायक मानाजी यांचीसुद्धा निवड करण्यात आली आहे. मजगाव येथील वाल्मिकी नागरी सहकारी पतसंस्थेची सार्वत्रिक निवडणूक नुकतीच झाली होती. या निवडणुकीत मजगाव येथील तिन्ही कोळी समाज एकत्र येऊन लढल्यामुळे येथे कोळी समाजाला मोठा विजय प्राप्त करता आला.

निवडणूक झाल्यावर नियमानुसार अध्यक्ष, उपाध्यक्ष निवड करण्यासाठी सहकार खात्याचे वाघमारेसाहेब यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्या प्रमाणे हि निवड जाहीर करण्यात आली. या सर्व संचालक यांचा कालावधी सन २०२४ ते २०२९ पर्यंत हि बॉडी कार्यरत राहणार आहे.

# खालापूरमध्ये सुंदर गाव पुरस्कार योजना समितीचा दौरा

**चौक : प्रतिनिधी**

आर आर (आबा) पाटील सुंदर गाव पुरस्कार योजना या समितीचा खालापूर तालुका दौरा सुरू झाला असून मुरूडचे गटविकास अधिकारी गजानन लेंढी यांच्या अध्यक्षतेखाली ११ ग्रामपंचायत यांची पाहणी करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री व ग्रामविकास मंत्री स्वर्गीय आर. आर. पाटील यांनी सुरू केलेली ग्रामस्वचछ्ता अभियान कार्यक्रम, तंटा मुक्ती कार्यक्रम आजही राज्यात राबविला जात आहे. यामुळे मनुष्य बळाचा वापर होऊन अनेक विधायक कार्यक्रम यशस्वी झाले आहेत. खालापूर तालुक्यातील ४४ ग्रामपंचायत यांनी सुंदर गाव योजनेत आपला सहभाग घेतला आहे. खालापूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी, ग्रुप ग्रामपंचायत बीड, ग्रुप ग्रामपंचायत साजगाव, ग्रुप ग्रामपंचायत शिरवली, ग्रुप ग्रामपंचायत जांभीवली, ग्रुप ग्रामपंचायत लोधिवली, ग्रुप ग्रामपंचायत गोरठण बु., ग्रुप ग्रामपंचायत होराळे, ग्रुप ग्रामपंचायत चांभार्ली, ग्रुप ग्रामपंचायत कलोते व ग्रुप ग्रामपंचायत इसांबे या ११ ग्रामपंचायतींचा तपासणी व पाहाणी दौरा करण्यात आला.

यात स्वचछता, व्यवस्थापन, दायित्व, अपारंपारिक ऊर्जा व पर्यावरण, पारदर्शक व तंत्रज्ञान, घनकचरा, प्लास्टिक निर्मूलन, अपंग पुनर्वसन, शाळा, अंगणवाडी या बाबत ग्रामपंचायत यांनी केलेल्या कार्याची व कामाची पाहणी करून मूल्यांकन करण्यात आले आहे. खालापूर तालुक्यातील ग्रामपंचायत यांनी केलेली कामे स्तुत्य असुन ग्रामपंचायत यांच्यात स्पर्धा निर्माण झाली आहे, काने समाधानकारक असल्याचे गटविकास अधिकारी गजानन लेंढी यांनी सांगितले.





**पनवेल महानगरपालिका**
**शहर अभियंता विभाग**

निविदा सूचना क्र.पमपा/बांधकाम/६५२२/ प्र.क्र.५१/४२३९/२०२३ — दिनांक : ०८/१२/२०२३

**ई–निविदा सूचना**

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निम शासकीय (Centeral Government/ State Government/Government Under taking) विभागात खालील कामासाठी पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी–१ शतमान पद्धतीनुसार ई–निविदा मागवित आहेत.

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १ | PMC/CE/248/2023-24 | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती–अ, खारघर, सेक्टर–६,येथील फुटपाथ काँक्रीटीकरण करणे. | ३९,६८,४६२/– |

या कामाच्या ई–निविदे बाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि. १२/१२/२०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/–
(डॉ. प्रशांत रसाळ)
अतिरिक्त आयुक्त–।
पनवेल महानगरपालिका



**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, अलिबाग सा.बां. विभाग, अलिबाग**
पिन कोड – ४०२ २०१
ई–मेल पत्ता :– alibag.ee@mahapwd.com  दुरध्वनी/फॅक्स क्रमांक :– (०२१४१) २२२०८४/२५०९६

**ई– निविदा सूचना क्र. ३३ सन २०२३–२०२४**

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ब–१ नमुन्यातील ई–निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत रुपये |
|---|---|---|
| १ | मुरूड तालुक्यातील नांदगांव सुरळपेठ माळी वाडी मार्ग ग्रा.मा. ७ कि.मी. ०/०० ते ०/५०० मध्ये रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे, जि रायगड | १२,६३,७६०.६३ |
| २ | मुरूड तालुक्यातील सायगांव वावडूंगी वरचीवाडी जोडरस्त्याचे मजबुतीकरण करणे व संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे ग्रा.मा. ३४ कि.मी. ०/०० ते ०/९००, जि. रायगड. | ८४,६९,४२४.४ |
| ३ | मुरूड तालुक्यातील सर्वे जोडमार्ग ग्रा.मा. २२ कि.मी. ०/०० ते ३/०० मध्ये रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे, जि रायगड | ६३,५१,०९३.८५ |
| ४ | मुरूड तालुक्यातील काकळघर चिंचघर रस्ता ग्रा.मा. १११ कि.मी. ०/०० ते ०/६०० मध्ये रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे, जि रायगड | १२,५९,९१२.०० |
| ५ | मुरुड तालुक्यातील काकळघर वांदेली रस्ता ग्रा.मा. ११९ कि.मी. ०/०० ते १/२०० मध्ये रस्ता मजबुतीकरण करणे व साकव बांधणे, जि. रायगड. | ८४,३३,१०९.८ |
| ६ | मुरुड तालुक्यातील रा.मा. ९२ ते खामदे गांव जोडरस्ता रस्ता मजबुतीकरण करणे व मोऱ्यांचे बांधकाम व संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे ग्रा.मा. ५० कि.मी. ०/०० ते १/०००, जि. रायगड. | ८४,८६,४६६.२५ |
| ७ | मुरुड तालुक्यातील कोर्लई ते तळवली रस्त्याचे मजबुतीकरण करणे ग्रा.मा. ८७ कि.मी. ०/०० ते १/१००, जि. रायगड. | ६३,२४,१९२.२३ |
| ८ | मुरूड तालुक्यातील मांडले बेलवाडी फणसाड मार्ग ग्रा.मा. १० कि.मी. ०/००० ते ४/००० मध्ये रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे, जि रायगड | ६३,२३,२३२.९७ |
| ९ | मुरुड तालुक्यातील महालुंगे डाकेळी जोडरस्त्याचे मजबुतीकरण करणे व मोऱ्यांचे पूर्नबांधकाम करणे ग्रा.मा. ३२ कि.मी. ०/०० ते १/६००, जि. रायगड. | ८४,५६,८६३.११ |
| १० | मुरूड तालुक्यातील सावरोली वेताळवाडी मार्ग ग्रा.मा. १८ कि.मी. ०/०० ते ०/८०० मध्ये रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे, जि रायगड | १६,८२,९७३.२३ |
| ११. | मुरुड तालुक्यातील रा.मा. ९२ ते उसडी मार्ग रस्ता मजबुतीकरण करणे व मोऱ्यांचे बांधकाम करणे ग्रा.मा. ४७ कि.मी. ०/०० ते १/०००, जि. रायगड. | ६३,४३,९५९.८६ |
| १२. | मुरूड तालुक्यातील प्ररामा ४ ते उसरोली आदाड वडघर रस्ता इजिमा ११३ किमी ०/०० ते ४/०० मध्ये रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे, जि रायगड | ८४,२८,४६२.६६ |

**ई–निविदा उपलब्ध कालावधी** :– दिनांक ११.१२.२०२३ (स.१०.००) ते दिनांक १८.१२.२०२३ (सं.१८.००)
**ई–निविदा उघडणे** :– दिनांक २१.१२.२०२३ (दु. ३.०० वा.)
(कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांचे कार्यालयात)

खालील संकेतस्थळावर ई–निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.com  २. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र./ सा.बां./अवि/निविदा/ ५५३६/२०२३
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, अलिबाग–४०२ २०१
दिनांक :– १/१२/२०२३

सही/–
(ज.ई. सुखदेवे)
कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग, जि.रायगड



**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**Re-E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. **Tender Fees:** Rs.500/- + GST

| Sr.No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1. | Tender No. & Name of Tender | **RFxNo :-7000029291 Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/ Re-e-Tender-60/ 2023-2024.** RFx Re-e-tender for work of supply & Installation of online UPS 20KVA 240Volt 3 Phase in 3 Phase Out at Division Office under EHV (O&M) Division Panvel. **Tender Amount:** Rs. 7,61,338/-, **EMD:** Amount Rs. 7,613/- |
| 2. | Online Downloading the RFx. | **11.12.2023, 18:00 Hrs. to 18.12.2023, 23:59 Hrs.** |
| 3. | Online Submission of the Rfx | **On or Before 18.12.2023 up to 23:59 Hrs.** |
| 4. | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **19.12.2023 at 11:00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. **022- 2746 5410. Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER,**
**EHV(O&M) DN PANVEL**



**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पनवेल तालुका यांचे समोर**
**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पहिला मजला कृषी उत्पन्न बाजार समिती, सहकार मार्ग, रायगड बाजाराच्या बाजूला पनवेल जि.रायगड ४१०२०६**

**महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० चे कलम १०१ खाली दाखल दावा नोटीस**

कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल ता. पनवेल जि. रायगड या संस्थेने या कार्यालयाकडे महाराष्ट्र सहकारी कायदा अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये खालील व्यक्ती विरूध्द थकीत कर्जाचा भरणा केला नसल्याचे नमुद करून वसुली प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे.

त्यानुसार या कार्यालयात वेळोवेळी सुनावणी ठेवण्यात आली, तथापी खालील नमुद व्यक्तींना सुनावणी नोटीसची पोहोच होत नसल्याने नैसर्गिक न्याय तत्वानुसार म्हणने दाखल करण्यासाठी जाहीर नोटीस देण्यात येत आहे या जाहीर नोटीस द्वारे आपणास पुन्हा एक संधी देण्यात येत असून सदर दाव्याबाबत अंतिम सुनावणी १८/१२/२०२३ रोजी सकाळी ११.३० वाजता ठेवण्यात आली असून सदर सुनावणीस आपण स्वतः वा आपले प्रतिनिधी मार्फत उपस्थीत राहावे आपण गैरहजर राहिल्यास आपल्या अनुपस्थीतीत दाव्याचा निकाल केला जाईल व नंतर आपले कोणतेही म्हणने ऐकून घेतले जाणार नाही.

**वैयक्तिक कर्ज**

| अ.क्र. | दावा क्रमांक | कर्जदार/जामिनदार | पत्ता | थकीत कर्ज | जाहीर नोटीस |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३५/२०२३ | श्रीमती हर्षाली महेश कांबळे (कर्जदार) | रा. कृष्णाई निवास, आर. एन. – ३०१ अे, प्लॉट नं. १३, सेक्टर–१६, कामोठे, शंकर मंदिराजवळ, ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०९ | ६२,५७९/– | प्रतिवादी क्र.१ ते ३ करीता |
| | | श्रीमती उर्मिला मिलिंद तांबे (जामिनदार) | रा. आर.एन.–३०१, विनायक सोसायटी, प्लॉट नं. २४, सेक्टर– १०, कामोठे, ता–पनवेल, जि – रायगड. ४१०२०९ | | |
| | | श्रीमती रक्षिता रविंद्र कदम (जामिनदार) | रा. रूम नं. १०३, बी–विंग, चॅनल स्टार को. ऑप. हौ. सोसायटी, सेक्टर–१६, कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड. ४१० २०९ | | |
| २ | ३६/२०२३ | श्रीमती सुरेखा पंजाबराव जाधव (कर्जदार) | रा. तेजस्विनी अपार्टमेंट, रूम नं.२०३, प्लॉट नं. ५६, सेक्टर– १२, कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड. ४१० २०९ | ५०,४७९/– | प्रतिवादी क्र.२ व ३ करीता |
| | | श्रीमती ज्योती शंकर जाधव (जामिनदार) | रा. हेमाली अपार्टमेंट, रूम नं. ३०१, प्लॉट नं. ३ए, सेक्टर–११, कामोठे, ता–पनवेल, जि– रायगड. ४१०२०९ | | |
| | | श्रीमती विठाबाई शरद भगत (जामिनदार) | रा. घर नं. ७०८, जे.एन.पी.टी. रोड, दत्त मंदिराजवळ, सेक्टर – २३, नौपाडा गाव, कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड. ४१० २०९ | | |
| ३ | ३७/२०२३ | श्री. विकास शांताराम शिर्के (कर्जदार) | रा. चॅनल कॉर्नर सोसायटी, ई विंग, १०३, सेक्टर– १६, प्लॉट नं. ६, कामोठे, ता.पनवेल, जि. रायगड. ४१० २०९ | ७१,४६४/– | प्रतिवादी क्र.२ व ३ करीता |
| | | श्रीमती माधुरी नितीन आंबेकर (जामिनदार) | रा. प्लॉट नं. २५/ डी, फ्लॅट क्र. २०३, सारथी पॅलेस, सेक्टर– ६, कळंबोली नोड, कामोठे, ता–पनवेल, जि – रायगड. ४१०२०९ | | |
| | | श्री. झेतून अब्दुल गफूर शेख (जामिनदार) | रा. लिमी बिझी, बिल्डिंग, रूम नं. ६०४, टॉवर नं. १, प्लॉट नं.१४/१५, सेक्टर–५ ई, कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड. | | |

सदरची नोटीस माझे सही शिक्यानिशी दिली आहे,
स्थळ – पनवेल
दिनांक – ५/१२/२०२३
जावक क्रमांक २६६१/२०२३–२४

शिक्का

सही/–
(भारती काटुळे)
सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था, पनवेल, जि.रायगड

निवडक

## जसखार येथे आरोग्यविषयक शिबिरे



**उरण :** गोरगरिबांना वेळेत रक्त उपलब्ध व्हावे. रक्ताअभावी कोणाचे जीव जाऊ नये. या अनुषंगाने दरवर्षी स्व. श्री गुलाबभाई म्हात्रे यांच्या स्मरणार्थ स्व.श्री. गुलाबभाई म्हात्रे मित्र मंडळ जसखार यांच्यातर्फे गरजूंना जीवनदान देण्याच्या उद्देशाने दरवर्षी जसखार येथे रक्तदान शिबीराचे आयोजन केले जाते. यंदा स्व. श्री गुलाबभाई म्हात्रे यांच्या स्मरणार्थ रविवारी (दि. १०) सकाळी १० ते सायंकाळी ४ या वेळेत श्री रत्नेश्वरी मंदिर, जसखार, तालुका उरण, जिल्हा रायगड येथे रक्तदान शिबिर, मोफत आरोग्य तपासणी शिबीर व डोळे तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन केतन म्हात्रे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी केतन म्हात्रे (९८७०९८४५४४) यांच्याशी संपर्क साधावा.

## महिलेची यशस्वी प्रसुती



**पनवेल :** अकाली गर्भपिशवीचे तोंड उघडल्यामुळे गुंतागुंतीची गर्भधारणा असलेल्या ३५ वर्षीय महिलेनची खारघरच्या मदरहूड हॉस्पिटलमध्ये यशस्वी प्रसुती करण्यात आली. डॉ. शैफाली पाटील (प्रसूती आणि स्त्रीरोग तज्ञ) आणि डॉ. सुरेश बिराजदार (नवजातशिशु आणि बालरोगतज्ञ) यांच्या नेतृत्वाखाली या यशस्वी प्रसुती करून आई आणि बाळ या दोघांनाही वाचविण्याच डॉक्टरांना यश मिळाले. सातव्या महिन्यात करण्यात आलेल्या प्रसुतीमध्ये महिलेने १.५ किलो वजनाच्या बाळाला जन्म दिला दिला. अकाली प्रसुतीमुळे जन्मानंतर बाळाच्या वाढीसाठी व त्याच्या विकासासाठी २४ दिवस एनआयसीयूमध्ये ठेवण्यात आले.

# सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या वायर्सचे जंजाळ

## नवी मुंबई महापालिकेने लक्ष देण्याची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईत पालिकेने शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यास सुरुवात केली आहे. हे करताना मात्र पालिकेकडून या कॅमेऱ्यांच्या वायर्सबाबत कोणतीही काळजी घेतलेले दिसून येत नसल्याचे पहायला मिळत आहे. कशाही प्रकारे गुंडाळून ठेवलेल्या वायर्समुळे जंजाळ तयार होऊ लागले आहे. अनेक ठिकाणी कॅमेऱ्यांची दिशादेखील चुकलेली दिसून येत असून याबाबत स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनी पालिकेच्या ही बाब लक्षात आणून दिली आहे.

नेरूळ सेक्टर १६ ए मधील स्थानिक सामाजिक कार्यकर्ते किरण पवार व त्यांचे सहकारी विशाल जाधव यांनी गेल्या काही दिवसांपासून नेरूळ पश्चिम विभागात नव्याने लावण्यात आलेल्या सीसीटीव्हीची पाहणी केली असता त्यामध्ये खूप त्रुटी आढळून आल्या जसे की कॅमेरा बंद असणे, कॅमेरा चुकीच्या पद्धतीने बसवणे, कॅमेरा वायरिंग व्यवस्थित नसणे आणि अशा बऱ्याच छोट्या मोठ्या कामांची कमतरता दिसून आली.

किरण पवार यांनी नवी मुंबई महापालिकेच्या मुख्यालयात भेट देऊन संबंधित शहर अभियंता विभागात या विषयावर चर्चा केल्यानंतर विभागातील अधिकारी प्रवीण पाटील यांच्यावतीने तत्काळ कंत्राट कंपनीला सूचना देऊन कारवाई करण्यास सांगितली आणि पुढील दोनच दिवसांत दिलेल्या तक्रारीवर काम करण्यात आले आहे तसेच किरण पवार यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे केलेल्या कामामध्ये फेरबदलदेखील करण्यात आलेला असून आता संपूर्ण विभागातील सीसीटीव्ही हे पूर्णपणे कार्यरत आहेत.



### एकूण १५००पेक्षा जास्त कॅमेरे

**नवी मुंबई महापालिकेच्या वतीने १५००हून अधिक सीसीटीव्ही कॅमेरे संपूर्ण शहरभर बसविण्यात येत असून त्याचा मध्यवर्ती नियंत्रण कक्ष महापालिका मुख्यालयात पहिल्या मजल्यावर स्थापित करण्यात आला आहे. या कॅमेऱ्यांमध्ये ९५४ स्थिर कॅमेऱ्यांचा तसेच ३६० अंशामध्ये गोलाकार चित्रण टिपणाऱ्या १६५ पीटीझेड कॅमेऱ्यांचा समावेश आहे. याशिवाय नवी मुंबई महापालिका क्षेत्राला लाभलेला विस्तारित सागरी किनारा लक्षात घेऊन सागरी सुरक्षेच्या दृष्टीने नऊ थर्मल कॅमेरे बसविण्यात येत आहेत**

**पालिकेने सीसीटीव्ही लावल्यानंतर तेथील तपासणी करणे आवश्यक आहे. वायर्स व्यवस्थित गुंडाळलेल्या आहेत का? कॅमेऱ्याची दिशा पाहणे आवश्यक आहे. एकीकडे पालिकेकडून विद्युत खांबांवर लटकलेल्या वायर्स काढून टाकण्याचे आदेश केबल चालकांना दिलेले आहेत. त्यामुळे खांब पडण्याचे प्रमाण कमी होणार असून, वायर्समुळे परिसराला आलेला बकालपणा कमी होणार आहे, मात्र दुसरीकडे सीसीटीव्ही कॅमेरे लावताना मात्र कंत्राटदारांकडून वायर्सचा बकालपणा तसाच ठेवला जात आहे. यात शिस्तबद्धता येणे आवश्यक आहे.**

**–मंगेश लाड**, सामाजिक कार्यकर्ते

**समाजसेवक किरण पवार यांनी या निमित्ताने नागरिकांना देखील सूचित केले की आपल्या सुरक्षेच्या दृष्टीने पालिकेच्या वतीने बसवण्यात आलेल्या सीसीटीव्हीची काळजी आपणदेखील घ्यावी, जेणेकरून भविष्यात आपल्या सोबत जर काही आपत्कालीन किंवा गुन्हेगारी गोष्टी घडल्या तर त्याकरिता पोलीस यंत्रणेला पाठपुरावा करणे सोईस्कर होईल आणि जर आपल्याला विभागात काही संशयास्पद कृत्य आढळून आले, तर आपण माझ्याशी संपर्क करू शकता. आपण सीसीटीव्ही माध्यमातून पाहणी करून पोलीस विभागाला तत्काळ कळवू जेणेकरून विभागामध्ये होणाऱ्या अपराधावर आळा बसेल.**

**–किरण पवार**, सामाजिक कार्यकर्ते

## नवी मुंबईत रंगणार आगरी-कोळी महोत्सव

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईमध्ये आगरी–कोळी समाज प्रबोधन ट्रस्ट यावर्षीचा वर्ष १७वे असून आगरी–कोळी महोत्सवात मोठ्या प्रमाणात नवी मुंबईकर रायगड मुंबई यांची पसंती असते. अखिल आगरी–कोळी समाज प्रबोधन ट्रस्ट आणि नवी मुंबई जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी नामदेव भगत यांच्या सहकार्याने नेरूळ येथील श्री गणेश रामलीला मैदानावर १० ते २१ जानेवारी २०२४ या दरम्यान भव्य आगरी–कोळी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

आगरी–कोळी महोत्सवामध्ये कार्यक्रमांबरोबरच आगरी–कोळी समाजाच्या ग्रामसंस्कृतीचा आकर्षक देखावा, संस्कृतीदर्शक चित्र प्रदर्शन, खाद्य संस्कृती, सुक्या मासळीचा बाजार, भव्य फनफेअर हे या महोत्सवाचे खास आकर्षण ठरणार आहे. आगरी–कोळी महोत्सवामध्ये खवय्यांना विविध प्रकारच्या मासळींचा आस्वाद घेता येणार आहे. झणकेबाज गावठी मटन व भाकर याबरोबरच अन्य खाद्यपदार्थांचीही रेलचेल असणार आहे. लहान मुलांसाठी दरवर्षी खेळणी, पाळणा याचे विशेष आकर्षण असते.

नवी मुंबई, ठाणे, मुंबईची उपनगरे, उरण–पनवेल भागातून मोठ्या प्रमाणावर नागरिक या आगरी–कोळी महोत्सवामध्ये सहभागी होत असतात. नवी मुंबईकरांनी या महोत्सवामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन महोत्वाचे आयोजक नामदेव भगत यांनी केले आहे.

## नेरूळमध्ये तरुणीवर जीवघेणा हल्ला; आरोपीस अटक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील नेरूळ येथील एका बस थांब्यावर बसची वाट पाहणाऱ्या एका तरुणीवर अनोळखी व्यक्तीने जीवघेणा हल्ला केला. तिच्या डोक्यावर बाटलीचा वार केल्यानंतर फुटलेली बाटली तिच्या पोटात भोसकण्याचा प्रयत्न केला. यात तरुणी जबर जखमी झाली होती. तिच्यावर सध्या उपचार सुरू असून हत्येचा प्रयत्न केल्याच्या गुन्ह्यांतर्गत आरोपीला अटक करण्यात आली आहे. हुसेन इमाम हसन शमशु असे अटक आरोपीचे नाव आहे. यातील जखमी



युवतीचे नाव निशा कुंभार असे आहे. निशा हि ऐरोलीत राहणारी असून तिच्या महाविद्यालय सेमिस्टर परीक्षा क्रमांक नेरुळ येथील एका महाविद्यालयात आला आहे. त्यामुळे चार तारखेला ती नेरुळ येथे आली व महाविद्यालयातील काम करत परत घरी जाण्यासाठी जवळच्या बस थांब्यावर खुशी कदम या आपल्या मैत्रिणी समवेत थांबली.

दोघीही परीक्षा संदर्भात बोलत असताना अचानक हातात काचेची बाटली घेऊन एक व्यक्ती आला आणि त्याने बाटलीने निशाला मारहाण सुरू केली. निशाणे प्रतिकार करताना ती बाटली फुटली, मात्र त्याच अवस्थेत फुटलेली बातमी निशाच्या पोटात खुपसण्याचा प्रयत्न केला हा वार निशाणे वाचवला, मात्र कमरेला मोठी दुखापत झाली. दरम्यान, दोन जण धावत आले त्यामुळे आरोपी पळून गेला. नेरूळ पोलीसही घटनास्थळी आले. त्यांनी तत्काळ निशाला नजीकच्या खासगी रुग्णालयात दाखल केले.

आरोपीचा शोध घेत आरोपीला अटक करण्यात आली आहे, अशी माहिती नेरूळ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक तानाजी भगत यांनी दिली. आरोपी याच परिसरात भीक मागणारा आहे. विक्षिप्त आणि मनोरुग्ण असल्याप्रमाणे वागतो, अशी माहिती काही प्रत्यक्षदर्शींनी दिली.

## आवरे येथील शाळेत आजी–आजोबा दिन

**उरण : बातमीदार**

आत्माराम ठाकूर मिशन संचलित जानकीबाई जनार्दन ठाकूर स्कूल आवरे या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत आजी–आजोबा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला कार्यक्रमाचे उद्घाटन आजोबा महादेव गावंड यांनी केले.



या वेळी कमळाकर गावंड, पार्वती गावंड, अहिल्या पाटील व गजानन म्हात्रे हे आजी–आजोबा उपस्थित होते. यावेळी विदयार्थ्यांच्या फॅन्सी ड्रेस स्पर्धा घेण्यात आल्या. त्यामध्ये रचित पावस्कर, श्रीयाश पाटील व दिविशा गावंड यांना अनुक्रमे प्रथम, दुद्वितिय, तृतीय क्रमांक मिळाला तसेच आजी–आजोबा याच्या संगीत खुर्ची व बादलीत चेंडू टाकणे या स्पर्धा घेण्यात आल्या, संगीत खुर्ची महीलामध्ये जनाबाई म्हात्रे व काशी पाटील यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितिय क्रमांक पटकवला तसेच पुरूषांमध्ये शंकर पाटील व विश्वास म्हात्रे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय क्रमांक पटकवला. तसेच बादलीत चेंडू टाकणे या स्पर्धेत महिलांमध्ये शुभांगी म्हात्रे व जनाबाई म्हात्रे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितिय क्रमांक पटकवला.

पुरूषांमध्ये विलास ठाकूर व शंभु गावंड यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितिय क्रमांक पटकवला. या कार्यक्रमामध्ये शिक्षक–पालक संघाच्या उपाध्यक्षा शुभांगी पाटील व सदस्या मिनाक्षी पावसकर, रसिता म्हात्रे, प्रणाली पाटील, प्रदिप वर्तक, संस्थेचे अध्यक्ष अशोक ठाकूर, मुख्याध्यापिका निकिता म्हात्रे व्यासपिठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शिल्पा भुसारी व स्वराली भोईर यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्राजक्ता नाईक यांनी केले, कार्यक्रम यशस्वी करण्यास शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मेहनत घेतली.

## कळंबोली पोलीस ठाण्याचे संपर्क अन् सतर्क अभियान

**कळंबोली : बातमीदार**

समाजात सध्या विविध प्रकारचे गुन्हे घडत असतात. त्याकरता पोलीस अन समाज, नागरिक, विद्यार्थी, पालक यांच्यामध्ये संपर्क आणि सतर्क राहण्याचे अभियान राबवून आपल्या प्रत्येकाच्या परिसरात चुकीचं, अनुचित प्रकार, गुन्हेगारी प्रकारच काही घडत असेल तर त्वरित कळंबोली पोलीस ठाण्याशी संपर्क साधून माहिती देण्याचे आवाहन कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप गुजर यांनी केले आहे. यासाठी कळंबोली पोलीस ठाण्यातील पोलीस काका आणि पोलीस दिदीचे संपर्क नंबरही जनतेच्या माहितीसाठी प्रसिद्ध केले आहेत.



पोलीस प्रशासनामुळे समाजातील सर्वच नागरिक सुखाची झोप घेऊ शकत आहेत. पोलीस २४ तास जनतेचे रक्षण करण्यासाठी तत्पर असतात, परंतु पोलिसांनाही कायदा सुव्यवस्था राखण्याच्या कामात विद्यार्थी, पालक, जनता, समाज यांनीही मोलाचे सहकार्य करणे अपेक्षित आहे. समाजानेही पुढाकार घेतला तर समाजातील गुन्हेगारीचे उच्चाटन करण्यास पोलिसांना अधिक बळ मिळेल. यासाठी कळंबोली पोलीस ठाण्याने संपर्क आणि सतर्क अभियान सुरू करून कळंबोली वसाहती मधील शाळा, महाविद्यालय, हाउसिंग सोसायटी, सार्वजनिक मंडळे, उद्याने, मंदिरे ,बस स्थानक, बाजारपेठ, भाजी मार्केट या ठिकाणी पोलीस ठाण्यामधील पोलीस काका आणि पोलीस दीदीचे नंबर ठळकपणे फलकावर प्रसिद्ध केले आहेत.

जनतेच्या सेवेसाठी कळंबोली पोलीस ठाण्यामधील एक सहाय्यक पोलीस निरीक्षक, एक पोलीस उपनिरीक्षक ,एक पोलीस हवालदार व एक पोलीस कर्मचाऱ्यांची नेमणूक ही त्यासाठी करण्यात आली आहे. त्यांचे मोबाईल नंबर कळंबोली मधील विविध ठिकाणी फलकावर ठळकपणे प्रसिद्ध करण्यात आले आहेत. समाजामध्ये जर काही अनुचित प्रकार घडत असेल तर त्याबद्दलची माहिती त्वरित संबंधित फोनवर सांगून पोलिसांना संपर्क साधून नागरिकांनी ही आपली सामाजिक बांधिलकी जोपासायची आहे. विद्यार्थी, विद्यार्थिनी, पालकांनी दिलेल्या नंबर मधील पोलीस काका आणि पोलीस दिदीशी त्वरित संपर्क साधून स्वतः ला व समाजाला सुरक्षित करावयाचे आहे.

शाळांमधील मुख्य प्रवेशद्वारावर देण्यात आलेले मोबाईल नंबर एका फलकावर प्रसिद्ध करण्याचे अभियान कळंबोली पोलीस ठाण्याकडून कळंबोली परिसरात राबविण्यात येत आहे. सुधागड विद्या संकुलातील मराठी प्राथमिक विद्यालयात मुख्याध्यापिका हेमलता पाटील यांच्या हस्ते फलकाचे अनावरण करून या अभियानाचा प्रारंभ झाला. सर्व शाळा व महाविद्यालयांनी अभियानाचे स्वागत करून संपर्क अभियान अमलात आणण्याचा विश्वास व्यक्त केला आहे.

## दिवाळे गावात मच्छीमारांसाठी विविध सुविधा

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी नवी मुंबईतील दिवाळे गाव हे दत्तक घेतले व या दिवाळे गावाचा पूर्ण कायापालट करून टाकला असून नवी मुंबईतील पहिले स्मार्ट व्हिलेज म्हणून दिवाळे गावाचे नाव हे दिल्लीपर्यंत घेऊन जाण्याचा मानस केला आहे. त्याचाच एक भाग म्हणून डोलकर मच्छीमार बांधवांकारिता जेट्टी बांधत आहेत.

या जेट्टीकरिता महाराष्ट्र शासनाने रक्कम १० कोटी रुपये निधी मंजूर केले असून या निधीमधून पूर्ण सर्व सुविधायुक्त जेट्टी उभारण्यात येणार आहे तसेच नव्याने होत असलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या समोरच ही जेट्टी असल्याने येथील स्थानिक मच्छीमार बांधवांना व्यवसायासाठी मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे. सोलर हायमास्टकरिता ही तब्बल रक्कम २५ कोटी रुपये एवढा मोठा निधी उपलब्ध केला असून संपूर्ण नवी मुंबई ही लक्ख प्रकाशित होणार आहे.



या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, आपण गावच्या विकासासाठी २५ कोटी आणले. या कामांचा भूमिपूजन करून ही कामे चालू केली. या दिवाळे गावाच्या विकासासाठी गेल्या अनेक वर्षांपासून अनेक कोटींची तरतूद करण्यात आलेली स्मार्ट व्हिलेज अंतर्गत भव्य, सुसज्ज सर्व सुविधांयुक्त मच्छी मार्केट, सुसज्ज शाळा, उद्यान, मासे सुकविण्यासाठी प्लॅटफॉर्म, स्टेज, समाज मंदिर, रिंगरोड, स्वाध्याय हॉल, प्रसाधनगृहे, लहान मुलांकरिता खेळणी, विरंगुळा केंद्र, गजेबो गार्डन, बहुउद्देशीय इमारत, ओपन जिम, चारचाकी वाहनतळ, भाजी व फळ मार्केट तसेच सुशोभीकरण करण्यात येणार आहे. याकरिता आमदार निधीची तरतूदही करण्यात येणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील ग्रामीण भागाचा विकास व्हावा, ग्रामीण भागातील नागरिकांना सोई–सुविधा उपलब्ध व्हाव्यात याकरिता प्रत्येक गाव हे स्मार्ट व्हिलेज तयार करावे, असे स्वप्न साकारले आहे असून आता हे गाव स्मार्ट व्हिलेज म्हणून तयार होणार आहे.

या वेळी उत्तर भारतीय मोर्चाचे राजेश राय, दर्शन भारद्वाज, जयश्री चित्रे, वेंकट चिखले, निलेश पाटील, निलेश डोंगरे, ज्ञानेश्वर कोळी, नीलकंठ कोळी, संतोष कोळी, डोलकर मच्छीमार सदस्य तुकाराम कोळी, खांदेवाले मच्छीमार अध्यक्ष रमेश हिंडे, जेष्ठ नागरिक संस्था अध्यक्ष चंद्रकांत कोळी आदी उपस्थित होते.

## बंधुत्वाच्या भावनेतून राष्ट्र उभे राहते -दिलीप मंडल

**नवी मुंबई : बातमीदार**

दुसऱ्यांच्या संवेदना जाणून घेणे, त्यात सहभागी व्हावेसे वाटणे यामधून परस्परांमध्ये बंधुभाव वाढतो, आपुलकीची भावना वृध्दिंगत होते व देश उभा राहतो ही राष्ट्र या शब्दामागील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका विशद करीत सुप्रसिध्द लेखक, विचारवंत दिलीप मंडल यांनी बाबासाहेबांच्या आभाळाएवढया व्यक्तिमत्वाकडे आपण ठराविक नजरेतून एकाच दृष्टीने पाहून चालणार नाही तर त्यांच्या व्यक्तित्वाचा सर्वांगीण विचार केला पाहिजे, असे मत व्यक्त केले.

नवी मुंबई महापालिकेच्या ऐरोली येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकात महापरिनिर्वाणदिनाच्या पूर्वसंध्येला 'विचारवेध' या व्याख्यान शृंखले अंतर्गत 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर और राष्ट्रनिर्माण' या विषयावर सुप्रसिध्द पत्रकार, लेखक दिलीप मंडल यांनी अभ्यासपूर्ण भाष्य करीत बाबासाहेबांची राष्ट्रनिर्माता ही प्रतिमा विविध उदाहरणे देत उभी केली.

बाबासाहेबांना समजून घेताना त्यांचे काळानुरुप बदलत गेलेले विचार, त्या–त्या कालखंडातील सामाजिक स्थिती लक्षात घेऊन समजून घेतले पाहिजेत असे सांगत राष्ट्रनिर्माण ही बाबासाहेबांची विचारयात्रा आहे, त्या अनुषंगाने त्यांच्याकडे एक यात्रिक म्हणून पाहा असे दिलीप मंडल म्हणाले.



विशिष्ट समुहाच्या न्याय व हक्कांसाठी लढणारा नेता ते संपूर्ण देशाच्या हिताचा एकत्रित विचार करणारा राष्ट्रव्यापी नेता ही बाबासाहेबांची उंच उंच होत गेलेली प्रतिमा त्यांच्या काळानुरुप बदलत गेलेल्या विचारांचा समग्र अभ्यास करुन एकत्रितपणे समजून घेतली पाहिजे असेही त्यांनी सांगितले.

बाबासाहेबांना गुरुस्थानी असलेल्या महात्मा फुले यांनी सार्वजनिक सभा बनवायची तर सर्व नागरिकांना अधिकार मिळाले पाहिजेत ही सर्वसमावेशक राष्ट्राची व्याख्या पहिल्यांदा मांडली. तोच विचार पुढे नेत बाबासाहेबांनी सर्वांना मताचा अधिकार असला पाहिजे हे प्रथमत: सांगितले. समता, स्वातंत्र्य व बंधुता या त्रिसूत्रीला प्राधान्य देत बाबासाहेबांनी सांस्कृतिक राष्ट्रीयत्व महत्वाचे मानले व यातूनच भारताचा राष्ट्र म्हणून विचार होऊन संविधान साकारले हे दिलीप मंडल यांनी विविध उदाहरणे देत स्पष्ट केले.

लोकशाही विचारांचे सबलीकरण, समाजातील सर्व घटकांना न्यायाची भूमिका, कटुता निर्माण करणाऱ्या विचारांचा निषेध आणि एकात्मतेची भावना या चार मूल्यांना प्राधान्य देणारा बाबासाहेबांच्या जीवन प्रवासातील वैचारिक विकासाचा काळाच्या प्रत्येक टप्प्यागणिक अभ्यास केला पाहिजे. अशा पध्दतीने बाबासाहेबांकडे साकल्याने पाहिल्यानंतर एक राष्ट्रव्यापी नेतृत्व आपल्या नजरेसमोर उभे राहते, असे दिलीप मंडल यांनी स्पष्ट केले.

## गेल कंपनीविरोधात उसर प्रकल्पग्रस्तांचे बेमुदत काम बंद आंदोलन

# जिल्हाधिकारी कार्यालयात होणार बैठक

**रेवदंडा : प्रतिनिधी**

उसर येथील गेल इंडिया कंपनीत स्थानिक प्रकल्पग्रस्तांनी विविध मागण्यांसाठी काम बंद आंदोलन पुकारले आहे. या पार्श्वभूमीवर येत्या मंगळवारी म्हणजेच १२ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजता रायगड जिल्हाधिकारी यांनी कंपनी व्यवस्थापन व प्रकल्पग्रस्त कामगार आंदोलन समितीची संयुक्त बैठक बोलाविली आहे. याबाबत पत्र देण्यात आले आहे.

उपजिल्हाधिकारी भारत वाघमारे यांच्या दालनात उसर प्रकल्पग्रस्तांची संयुक्त प्रकल्पग्रस्त कामगार आंदोलन समिती आणि कंपनी व्यवस्थापन यांच्यात झालेल्या अंतिम चर्चेत प्रकल्पग्रस्तांच्या समितीच्या लेखी कराराच्या मागणीचा प्रस्तावास गेल इंडिया कंपनीने नकार दिला. यामुळे समितीने अध्यक्ष निलेश गायकर यांच्या नेतृत्वाखाली १ डिसेंबरपासून गेल इंडिया कंपनीविरोधात बेमुदत काम बंद आंदोलन सुरू केले आहे.

**सहा गावांतील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित**

गेल इंडिया लि.ने उसर येथे नव्याने येत असलेल्या पॉलिमर कंपनी प्रकल्पासाठी नाईक कुणे, कंटक कुणे, धसाडे कुणे, उसर, धोटवडे, मल्याण या सहा गावातील २४७ शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या आहेत.

येथील प्रकल्पग्रस्तांनी प्रकल्पग्रस्त कामगार आंदोलन समितीमार्फत न्याय्य हक्कांसाठी १५ सप्टेंबर रोजी साखळी उपोषणास सुरुवात केली होती. जर कंपनीची मुजोरी सुरू राहिली, तर ३ ऑक्टोबरपासून कामबंद आंदोलन छेडण्यात येईल, असे इशाऱ्याचे पत्रही कंपनी व प्रशासनाला देण्यात आले होते.

उपजिल्हाधिकारी भारत वाघमारे यांच्या दालनात २८ नोव्हेंबर रोजी उसर प्रकल्पग्रस्तांच्या संयुक्त प्रकल्पग्रस्त कामगार आंदोलन समिती व कंपनी व्यवस्थापन यांच्यात चर्चा झाली, मात्र प्रकल्पग्रस्त संयुक्त कामगार आंदोलन समितीच्या लेखी कराराच्या प्रस्तावास कंपनी व्यवस्थापनाने नकार दिल्याने समितीचे अध्यक्ष निलेश गायकर यांच्या नेतृत्वाखाली गेल इंडिया कंपनीविरोधात बेमुदत काम बंद आंदोलन सुरू केले आहे.

प्रकल्पग्रस्तांच्या समस्यांबाबत जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय राजस्व सभागृहात १२ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजता उसर गेल इंडिया कंपनी व्यवस्थापन आणि प्रकल्पग्रस्त कामगार आंदोलन समितीची बैठक होणार आहे. याबाबतचे पत्र उपजिल्हाधिकारी वाघमारे यांनी गेल व्यवस्थापन व संयुक्त प्रकल्पग्रस्त कामगार आंदोलन समितीचे अध्यक्ष निलेश गायकर यांना दिले आहे.

# आता शिक्षकांनाही मिळणार आश्वासित प्रगती योजनेचा लाभ

■ वेतनेतर अनुदानासाठी तरतूद करण्याचे आश्वासन



**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटनेच्या शिष्टमंडळाने नुकतीच महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांची त्यांच्या देवगिरी या शासकीय निवासस्थानी भेट घेऊन शिक्षकांच्या मागण्यांचे निवेदन दिले. शिक्षकांना १०-२०-३० ही आश्वासित प्रगती योजना लागू करावी, वेतनेतर अनुदान उपलब्ध करण्यात यावे आदी प्रमुख मागण्यांचा समावेश होता.

याबाबत अजित पवार यांनी शिक्षकांना लवकरच कॅबिनेट मंजुरी घेऊन आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत आश्वासन दिले तसेच शिक्षकांच्या वेतनेतर अनुदानाबाबत येत्या हिवाळी अधिवेशनात पुरवणी बिल मंजूर करून निधीची तरतूद करु, असे स्पष्ट आश्वासन दिले.

यानंतर शिष्टमंडळाने ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन तसेच ग्रामविकास सचिव एकनाथ डवले यांची भेट घेऊन आंतरजिल्हा बदली तातडीने करण्याबरोबरच जिल्हातंर्गत बदलीबाबत निवेदन देऊन चर्चा केली. आंतरजिल्हा बदलीबाबत फॉर्म भरण्यासाठी व दुरुस्तीसाठी तीन दिवसांची मुदत देण्यात येणार आहे आणि त्यानंतर आठ ते दहा दिवसांत बदली प्रक्रिया पार पडेल, असे ग्रामविकास सचिव डवले यांनी सांगितले.

जिल्हातंर्गत बदलीबाबत सध्या अवघड क्षेत्रात काम करणाऱ्या तसेच विस्थापित व बदली इच्छुक शिक्षकांना संधी देण्याबाबत विचार सुरू आहे, कारण बदलीचे नवीन धोरण अद्याप निश्चित झालेले नाही. त्यामुळे सर्वसाधारण बदलीबाबत सध्या निर्णय घेता येणार नसल्याचे ग्रामविकास सचिव यांनी स्पष्ट केले.

शिक्षकांना मुख्यालयी राहण्याची अट शिथिल करावी तसेच केंद्रप्रमुख पदोन्नतीबाबत राज्यभर स्पष्टता आणून पदोन्नती पूर्ण करावी आदी मागण्या करण्यात आल्या.

शिष्टमंडळात मध्यवर्ती संघटनेचे राज्य अध्यक्ष केशवराव जाधव, सचिव राजेश सुर्वे, कोषाध्यक्ष साजिद अहमद, सहसचिव उत्तरेश्वर मोहळकर, कार्यालयीन सचिव यादव पवार, बिपिन साळवे, प्रसिद्धी प्रमुख कल्याण लवांडे आदी उपस्थित होते.

# माथेरानच्या चर्मोद्योगाला झळाळी

## आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात देशी-विदेशी ग्राहकांची पसंती

**कर्जत : प्रतिनिधी**



माथेरान येथील चामड्याच्या वस्तूंना सर्वत्र मागणी असते. या चामड्याच्या वस्तू देशाची राजधानी असलेल्या नवी दिल्ली येथील आंतरराष्ट्रीय प्रदर्शनातदेखील अग्रक्रमावर राहिल्या आहेत. या वस्तू अग्रक्रमाने खरेदी करण्यासाठी देश-विदेशातील ग्राहकांची झुंबड उडाली होती.

नवी दिल्ली येथील आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात महाराष्ट्र राज्यातून माथेरान येथील चामड्याच्या वस्तू विक्रीचा एक स्टॉल लावण्यात आला होता. या प्रदर्शनात मांडण्यात आलेल्या चामड्याच्या वस्तू माथेरान येथे विविध कारागिर, व्यावसायिक यांनी बनविल्या होत्या. हल्लीच्या संगणकाच्या युगात या चामड्याच्या वस्तूंबद्दल माहिती मिळत असल्याने व आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात माथेरानमधील चामड्याच्या वस्तू उपलब्ध होत असल्याने त्यांना प्रदर्शनात मोठी मागणी दिसून आली.

चर्मोद्योग हा माथेरानचा मूळ व्यवसाय असून ४२व्या आंतरराष्ट्रीय व्यापार मेळ्यामध्ये माथेरानमधील चामड्याच्या वस्तूंना बाजारपेठ मिळाली होती. महाराष्ट्र पॅव्हिलियन येथे राज्याच्या विविध शहरांतील कारागिरांनी आपले उत्पादने विक्रीस ठेवले असून दिल्लीकरांचा प्रतिसाद उत्तम मिळाला. यात माथेरानच्या उत्पादनांना पसंती मिळाली. त्यामुळे त्यांचा हुरूप आणखी वाढला आहे.


### आंतरराष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेसाठी

# रायगडचा कुणाल पिंगळे रवाना

**खोपोली : रामप्रहर वृत्त**

खोपोली येथील राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग खेळाडू कुणाल पिंगळे (लोखंडे जिम) याची निवड आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी झाली आहे. या स्पर्धेसाठी कुणाल मुंबईहून रवाना झाला.

आशियाई पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप स्पर्धा १० ते १८ या कालावधीत बहारू (मलेशिया) या ठिकाणी होणार आहे. ५३ किलो वजनी गटाच्या जुनियर स्पर्धेत कुणाल हा भारत देशातर्फे सहभागी होणार आहे. यासाठी कुणाल आणि त्याचे जिम संचालक प्रतीक लोखंडे यांना महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे सचिव, आंतरराष्ट्रीय पंच, शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त संजय सरदेसाई यांनी अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले आहे.



पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडचे अध्यक्ष गिरीश वेदक, उपाध्यक्ष श्रीनिवास भाटे, कार्याध्यक्ष यशवंत मोकल, सहसचिव सचिन भालेराव तसेच दत्तात्रेय मोरे, माधव पंडित, संदीप पाटकर, सुभाष टेंबे, मानस कुंटे यांनी कुणाल पिंगळेला आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# राज्यस्तरीय नाविन्यपूर्ण व जिल्हा वार्षिक योजना राबविण्यासाठी १५ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

**अलिबाग : प्रतिनिधी**

क्षेत्रीय स्तरावर सध्या व्यापक प्रमाणावर सुरू असलेले वंध्यत्व निवारण शिबिरे इ. लक्षात घेता या योजनांमध्ये जास्तीत जास्त लाभार्थ्यांना अर्ज भरता यावे यासाठी सन २०२३-२४ या वर्षासाठी ah.mahabms या प्रणालीवर राज्यस्तरीय नाविन्यपूर्ण व जिल्हा वार्षिक योजना राबविण्यासाठी १५ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली असल्याची माहिती जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ.सचिन देशपांडे यांनी दिली.

सन २०२३-२४ या वर्षासाठी ah.mahabms या प्रणालीवर राज्यस्तरीय नाविन्यपूर्ण व जिल्हा वार्षिक योजना राबविण्यासाठी वेळापत्रक निश्चित करण्यात आले होते. या वेळापत्रकानुसार सन २०२३-२४साठी ऑनलाईन अर्ज स्वीकारणे व जुने लाभार्थीमार्फत कागदपत्रे अपलोड करणे आणि जिल्हा स्तरावर कागदपत्रे पडताळणी करून पडताळणी करून निवड पूर्ण करणे याची मुदत ८ डिसेंबर रोजी संपुष्टात आली आहे.

९ नोव्हेंबर ते १५ डिसेंबरपर्यंत सन २०२३-२४साठी ऑनलाईन अर्ज स्वीकारणे, जुने लाभार्थीमार्फत कागदपत्रे अपलोड करणे आणि जिल्हा स्तरावर कागदपत्रे पडताळणी करून निवड पूर्ण करणे, यासाठी एकूण कालावधी ३७ दिवस. १६ व १७ डिसेंबर डाटा बॅकअप करणे, एकूण कालावधी दोन दिवस. १८ ते २० डिसेंबर, सन २०२३-२४च्या लाभार्थ्यांची रॅंडमायझेशन पद्धतीने प्राथमिक यादी तयार करणे, एकूण कालावधी तीन दिवस. २१ डिसेंबर राखीव, एकूण कालावधी एक दिवस. २२ ते २६ डिसेंबर २०२३, सन २०२३-२४मधील नवीन प्राप्त अर्जांच्या अनुषंगाने जिल्हा स्तरावर कागदपत्रे पडताळणी करून निवड पूर्ण करणे. एकूण कालावधी पाच दिवस. २७ ते २९ डिसेंबर २०२३, सर्व लाभार्थ्यांमार्फत कागदपत्रातील त्रुटी पूर्तता, एकूण कालावधी तीन दिवस. ३० डिसेंबर २०२३, कागदपत्रे अंतिम पडताळणी, एकूण कालावधी एक दिवस. ३१ डिसेंबर २०२३ पात्र अंतिम लाभार्थी यादी तयार, कालावधी एक दिवस.

## माथेरान शटलसेवेतून २.३६ कोटी महसूल प्राप्त

**रोहे : प्रतिनिधी**

माथेरान हे मुंबईतील पर्यटकांसाठी सर्वांत जवळचे आणि लोकप्रिय पर्यटनस्थळ आहे. नेरळ, अमन लॉज आणि माथेरानदरम्यानच्या प्रवाशांसाठी शटलसेवेसह मध्य रेल्वेने हे ठिकाण एक प्रमुख पर्यटनस्थळ म्हणून लोकप्रिय करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

पर्यटकांना आरामदायी प्रवास देण्याबरोबरच या सेवा स्वस्त आणि जलद साहित्याची वाहतूक करण्यासही मदत करते. यामुळे एकूण एप्रिल ते नोव्हेंबर या कालावधीत ३,३४,०४२ प्रवाशांची वाहतूक करून २.३६ कोटी रुपये महसूल प्राप्त झाला आहे. ही संख्या सुरक्षित व आरामदायी प्रवासासाठी रेल्वेची प्राधान्य भूमिका दर्शवतात.

# खालापूर पं.स.तर्फे दिव्यांग दिन साजरा

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर पंचायत समितीच्या वतीने जागतिक दिव्यांग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी तालुक्यातील दिव्यांग बांधव व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खालापूर पंचायत समितीच्या सभागृहात जागतिक दिव्यांग दिन उत्साहाने साजरा करण्यात आला. या वेळी दिव्यांगांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले, तर पंचायत समितीच्या वतीने दिव्यांगांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. विस्तार अधिकारी महादेव शिंदे यांनी दिव्यांगांमध्ये त्यांच्या हक्कांविषयी जनजागृती करून मार्गदर्शन केले. कार्यालयीन



अधीक्षक संजीव चोपडे यांनी दिव्यांग यांच्या योजनांची माहिती दिली, त्याचप्रमाणे कोणत्या विभागात कोणती माहिती व कोणते अनुदान मिळते या विषयी मार्गदर्शन केले.

या वेळी सर्वांना वैश्विक ओळखपत्राचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास दिव्यांग बंधू-भगिनींसह सरपंच, सदस्य, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# गुरूकुल शाळेत ऑलिम्पिकचे उद्घाटन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील चौक येथील श्री स्वामी नारायण गुरूकुल आंतरराष्ट्रीय शाळेत आयोजित ऑलिम्पिकचे उद्घाटन गुरुवारी उत्साहात झाले.

उद्घाटन समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून इंडिया बुक ऑफ रेकॉर्डस प्राप्त करणारे व ४००हून अधिक धावण्याच्या स्पर्धेत भाग घेऊन भारताचे नाव उंचावणारे अनिल शिवप्पा कोरवी, हॉलीबॉलचे राष्ट्रीय खेळाडू तथा रिलायन्स फाउंडेशन स्कूलचे शारीरिक शिक्षक लक्ष्मण चलमले, अजय पाटील, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष अशोक पटेल, उद्योजक बाळा जांभळे उपस्थित होते.

श्री स्वामी नारायण गुरूकुलचे संचालक परमपूज्य विश्वमंगलदास स्वामी व ब्रम्हस्वरूप स्वामी यांनी विद्यार्थ्यांना आयुष्यात आध्यात्मिक जीवनाचे काय महत्त्व आहे यावर मार्गदर्शन केले. याशिवाय त्यांनी बाहेरील शाळेतून आलेल्या विद्यार्थ्यांना गुरूकुलचे महत्त्व सांगितले.

प्रमुख पाहुणे अनिल कोरवी यांनी सांगितले की, आयुष्यात हार कधी मानू नका, प्रयत्न करीत राहा, यशस्वी व्हाल.




राष्ट्रीय खेळाडू लक्ष्मण चालमले यांनी म्हटले की, आयुष्यात तीन गोष्टी नेहमी लक्षात ठेवा. पहिली आम्ही का खेळतो अर्थात याच उत्तर आहे मैत्रीसाठी. दुसरी गोष्ट म्हणजे आम्ही कुठेही जाऊ तिथे सर्वोत्तम खेळ करू आणि तिसरी गोष्ट आम्ही जेवढे प्रयत्न करू ते मोठ्या आनंदाने करू.

या वेळी सर्व शाळेतून आलेल्या विद्यार्थ्यांनी मशाल हातात घेऊन संपूर्ण मैदानात फेरी मारून खेळांबद्दल असलेले आपले प्रेम व्यक्त केले.

ऑलिम्पिकच्या पहिल्या दिवशी विविध खेळांच्या स्पर्धा झाल्या. या स्पर्धांवेळी स्वामी नारायण गुरुकुल नवी मुंबईचे मुख्याध्यापक डॉ.पी. हरिबाबू रेड्डी, शिक्षकवर्ग, पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन गुरूकुलचे शिक्षक रामकृष्ण शुक्ला यांनी केले.

# सुगरण पक्ष्यांची घरटी होताहेत दुर्मीळ

**खोपोली : प्रतिनिधी**

सुगरण पक्ष्याएवढे घरटे बनविण्याचे तंत्रज्ञान अन्य कोणत्याही पक्ष्यात दिसून येत नाही, मात्र बदलत्या काळात आणि सिमेंटच्या जंगलामध्ये अनेक वृक्ष नामषेश होत असल्याने सुगरण पक्ष्यासाठी घरटे कुठे बांधायचे हा प्रश्न सध्या निर्माण झाला आहे. त्याचबरोबर वणवे लावले जात असल्यानेही पक्ष्यांची घरटी जळून खाक होतात.

जन्माला येणाऱ्या पिलासाठी ही सुगरण पावसाळा सुरू झाल्यावर घरटे विणण्यास सुरुवात करते, कारण तो तिचा प्रजनन काळ असतो. जुन-जुलैमध्येच घरटे विण्याचे काम दरवर्षी पूर्ण होते. झाडावर उलट्या स्थितीत खोपा बनविण्यात सुगरण हीच सुगरण मानली जाते. बारीक गवताच्या सहाय्याने खोपा बनविला जातो. यामध्ये पावसाचा, उन्हाचा शिरकाव होत नाही.

सुगरणीला गवळण, विणकर या नावानेही ओळखले जाते. २० -३० पक्ष्यांचा समावेश असलेले हे थवे काटेरी बाभळीच्या किंवा नारळाच्या फांद्यांवर



खोपा विणलेले पहावयास मिळत आहे. एक प्रकारे त्यांची ही घरांची सोसायटीच म्हणावी लागेल एवढी अप्रतिम त्यांची वास्तू असते. झाडावरील पाने अथवा गवत चोचीने साळून एक अथवा दोन मजल्यांचा आकर्षक, सुंदर खोपा तयार करीत असल्यामुळे या घरट्याकडे पाहताच अरे खोप्यामधी खोपा सुगरणीचा चांगला, पिलासाठी जीव तिने झाडाला टांगला या काव्यपंक्ती आठवतात.

# साहित्य विक्रीसाठी निविदेचे आवाहन

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाड शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील वापरुन निर्लेखित झालेली यंत्रसामुग्री व उपकरणे साहित्याच्या विक्रीसाठी फक्त जीएसटी नोंदणीधारक खरेदीदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. या निविदा प्रक्रियेकरिता लिफाफा पद्धतीने निविदा सादर करावयाची आहे.

या नमुन्यातील पूर्ण माहिती अचूकपणे भरलेली निविदा अर्जासोबत पाच हजार रुपये अनामत रक्कम जमा करणे गरजेचे असेल. या रकमेचा भरणा प्राचार्य, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, महाड जि.रायगड या नावाने डीडीच्या स्वरुपात करावा. इच्छुक जीएसटी नोंदणीधारक खरेदीदारांनी वर उल्लेख केलेल्या विहीत नमुन्यातील निविदा अर्ज डीडीसह (प्रपत्र अ व प्रपत्र ब करिता वेगळे स्वतंत्र लिफाफा द्यावा) २८ डसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुटीचे दिवस वगळून सिलबंद लिफाप्यात कार्यालयात जमा करावा. संपूर्ण निविदा प्रक्रीया रद्द करण्याचा किंवा त्यामध्ये फेरबदल करण्याचा संपूर्ण अधिकार प्राचार्य, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, महाड जि.रायगड यांनी राखून ठेवला आहे. या सिलबंद निविदा २९ डिसेंबर रोजी दुपारी २.३० वा. संस्थेच्या प्राचार्याच्या कक्षात उघडण्यात येतील, प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, महाड एन.एस. पुरकर यांनी कळविले आहे.

# अटल करंडक























दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com